रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
वर्ष १६ ◆ अंक ३०९
www.ramprahar.com
सोमवार, २७ मे २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## मान्सूनच्या पार्श्वभूमीवर कोकणातील समुद्री पर्यटन बंद

**रत्नागिरी :** कोकणातील समुद्रकिनारे नेहमीच पर्यटकांना आकर्षित करतात. त्यासाठी राज्यासह



देशभरातून अनेक पर्यटकांची पसंती कोकण असते, पण पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर रविवार (दि. २६)पासून ३१ ऑगस्टपर्यंत असे तीन महिने कोकणातील पर्यटन बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे तसेच मुरूड जंजिरा किल्लाही पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. कोकणात मान्सूनचे आगमन होणार असल्याने या ठिकाणी मासेमारीसाठीही बंदी घालण्यात आली आहे. मान्सूनचे आगमन ३१ मे रोजी केरळमध्ये, तर १० जूनला मुंबईसह कोकणात होणार आहे. दरम्यान, मुंबई शहर आणि उपनगरांसाठी पुढील २४ तासांमध्ये हलक्या पावसाची शक्यता असून आकाश अंशत: ढगाळ राहण्याचा अंदाज प्रादेशिक हवामान खात्याने वर्तवला आहे.

**अंतरंग**
- ‘कोकण पदवीधर’साठी भाजपची तयारी/२
- टंचाईग्रस्त गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा/५
- अलिबागच्या रूद्रा पिळणकरने लाठीकाठीत जिंकली पदके/८

# एनडीए सरकारला देशाची साथ

## पंतप्रधान मोदींचा विश्वास

**मिर्झापूर : वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचे सहा टप्पे पार पडले आहेत. या सहा टप्प्यांतील मतदानावेळचा लोकांचा कल पाहता त्यांनी भाजपप्रणित एनडीए सरकारची पुष्टी केली आहे. देशातील जनतेने तिसर्‍यांदा मोदी सरकार स्थापन करण्याचा निर्धार केला आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. ते रविवारी (दि. २६) उत्तर प्रदेशमधील मिर्झापूर येथे सभेत बोलत होते.



या वेळी पंतप्रधान मोदी यांनी उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री तथा समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले, समाजवादी पक्षाचा कायदा आणि सुव्यवस्थेशी ३६चा आकडा आहे. यांचे सरकार असताना पोलीस मोठ्या कष्टाने एखाद्या दहशतवाद्याला पकडायचे, मात्र त्यानंतर हे सपवाले त्या दहशतवाद्यांना सोडून देत होते. एखाद्या पोलीस अधिकार्‍याने असे करण्यास नकार दिला, तर हे लोक त्या अधिकार्‍याला निलंबित करायचे. या सपवाल्यांनी संपूर्ण उत्तर प्रदेश आणि पूर्वांचल भागाला गुन्हेगारांचा अड्डा बनवले होते. येथील लोकांची जमीन असो अथवा त्यांचे आयुष्य ते कधी हिरावले जाईल हे सांगता येत नव्हते. माफिया आणि गुंडांच्या टोळ्या यांच्या सरकारची व्होट बँक होती.

आमचा देशाच्या विकासाचा हेतू, सरकारची चांगली धोरणे आणि देशभक्ती पाहून लोकांनी पुन्हा एकदा आमचीच निवड केली आहे. दुसर्‍या बाजूला आपल्या देशातील जनता इंडिया आघाडीवाल्या लोकांना चांगलीच ओळखून आहे. त्यांचे खरे हेतू जनतेला माहिती आहेत. त्यामुळे लोक त्यांचा स्वीकार करणार नाहीत, असा दावा पंतप्रधान मोदींनी केला.

आपल्या परंपरेत ज्येष्ठ महिना खूप खास असतो. या मुहूर्तावर आपण विरोधकांना कायमचा रामराम करून आपल्या देशात रामराज्य आणूया. उत्तर प्रदेशमधील लहान मुलांनाही राजकारण चांगलेच कळते. येथील जनता योग्य लोकांची निवड करेल. कुठलीही शहाणी व्यक्ती बुडणार्‍या कंपनीचे शेअर्स खरेदी करीत नाही. त्याचप्रमाणे उत्तर प्रदेशमधील जनता समाजवादी पक्षाला मत देणार नाही. ते आमच्याच सरकारला साथ देतील, असा विश्वास पंतप्रधान मोदींनी या वेळी व्यक्त केला.

# संजय राऊतांच्या दाव्याचे राजकीय वर्तुळात पडसाद

## भाजप नेत्यांनी घेतला समाचार



**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी त्यांच्या रोखठोक या सदरात भारतीय जनता पक्षाबाबत गंभीर दावे केले आहेत. या दाव्यांना भाजपकडून प्रत्युत्तर देण्यात आले आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर या संदर्भात भूमिका स्पष्ट केली आहे. याशिवाय सुधीर मुनगंटीवार, प्रवीण दरेकर यांनीही संजय राऊतांना प्रत्युत्तर दिले आहे. त्यातच काँग्रेस नेते विकास ठाकूर यांनीही संताप व्यक्त केला आहे.

संजय राऊत यांनी, गडकरी यांचा नागपुरात पराभव व्हावा यासाठी मोदी-शाह-फडणवीसांनी एकत्र प्रयत्न केले. गडकरींचा पराभव होत नाही याची खात्री पटल्यावर फडणवीस हे नाइलाजाने नागपुरात प्रचारात उतरले. गडकरींच्या पराभवासाठी सर्व प्रकारची रसद फडणवीस यांनीच पुरवली हे संघाचेच लोक नागपुरात उघडपणे बोलताना दिसतात’ असे लेखात म्हटले आहे. त्याचप्रमाणे आता भाजपचे सरकार आले, तर अमित शाह हे योगी आदित्यनाथ यांना घरी पाठवतील, असा दावाही राऊतांनी केला आहे.

यावर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावर खोचक शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. उबाठाचे अधिकृत आणि शरद पवार गटाचे स्वयंघोषित प्रवक्ते संजय राऊत यांनी आज पुन्हा अकलेचे तारे तोडत भाजपच्या अंतर्गत राजकारणावर भाष्य केले आहे. राऊत हे उद्धव ठाकरे यांचे कर्मचारी आहेत, पण ते शरद पवार यांची चाकरी करतात. ते भ्रमिष्ट अवस्थेत ‘रोखठोक’ लिहित असावेत. भाजप हा पक्ष नाही तर परिवार आहे. ज्यांनी आयुष्यभर गटातटाचे राजकारण केले त्या संजय राऊतांना परिवार काय कळणार? असा सवाल बावनकुळेंनी केला आहे.

### काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांचीही टीका

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रसद पुरवल्याच्या दाव्यावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या विरोधातील नागपूरमधील काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांनीही टीका केली आहे. भाजपशी त्यांचे काय दुखणे आहे ते त्यांनी निपटावे, पण महाविकास आघाडीचे बंधन त्यांनी पाळावे. नाहीतर राऊतांच्या विरोधात आम्ही खूप बोलू शकतो, असा इशारा देत ठाकरे यांनी संताप व्यक्त केला आहे.


संजय राऊतांच्या बाबतीत प्रथम शरद पवार नंतर स्वतः आणि शेवटी उद्धव ठाकरे आणि उबाठा गट असा क्रम आहे. त्यामुळे राऊतांच्या डोक्यातून असेच काहीतरी बाहेर पडणार. २०१९मध्ये स्वतः मुख्यमंत्री होण्यासाठी संजय राऊतांनीही प्रयत्न केले होते, पण त्यांचा डाव यशस्वी झाला नाही. हिंमत असेल तर एक ‘रोखठोक’ त्यावरही येऊ द्या, असे आव्हानही बावनकुळेंनी राऊतांना दिले आहे. (पान २ वर..)

# नाशिकमध्ये ज्वेलर्सकडे सापडले २६ कोटींचे घबाड

## नोटांची बंडले जप्त; ९० कोटींच्या संपत्तीची कागदपत्रेही ताब्यात

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकमधील सुराणा ज्वेलर्सवर प्राप्तिकर विभागाने धाड टाकून ३० तास शोधमोहीम राबविली. यानंतर ज्वेलर्समधून २६ कोटींची रोकड जप्त करण्यात आली, तर ९० कोटींच्या संपत्तीची कागदपत्रेही ताब्यात घेण्यात आली आहेत. नागपूर आणि जळगावमधील अधिकार्‍यांनी एकत्र येऊन ही कारवाई केली. विशेष म्हणजे जप्त केलेली रोकड मोजण्यासाठी अधिकार्‍यांना १४ तासांचा वेळ लागला.



गेल्या काही दिवसांत महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात प्राप्तिकर विभागाकडून कारवाई होत आहेत. काही दिवसांपूर्वी नांदेडमधील संजय भंडारी नावाच्या व्यावसायिकावर अशाच प्रकारे कारवाई करीत १७० कोटींची बेहिशोबी मालमत्तेवर टाच आणली गेली होती, तर धाडीत १४ कोटींची रोकड आणि आठ किलो दागिने जप्त केले होते. त्यानंतर नाशिकमध्ये मोठी कारवाई झाल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

प्राप्तिकर विभागाने शनिवारी सकाळी नाशिकमध्ये सुराणा ज्वेलर्सच्या दुकानावर धाड टाकली. अधिकार्‍यांच्या पथकाने दिवसभर आर्थिक व्यवहारांचे कागदपत्र, घेवाणदेवाणसंबंधी व्यवहाराचे दस्ताऐवज तपासले. सलग ३० तास ही कारवाई सुरू होती. प्राप्तिकर विभागाच्या अधिकार्‍यांनी ज्वेलर्स आणि त्यांच्याशी संबंधित रिअल इस्टेट व्यवसायाच्या कार्यालयातही धाड टाकली तसेच नाशिकच्या राका कॉलनीमध्ये असलेल्या बंगल्यावरही स्वतंत्र पथकाकडून शोधमोहीम राबविली गेली.

## आज दहावीचा निकाल

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाकडून घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी (दि. २७) जाहीर होणार आहे. हा निकाल दुपारी १ वाजता ऑनलाईन पाहता येईल.

सीबीएसईने काही दिवसांपूर्वी दहावी आणि बारावीचा निकाल जाहीर केला होता. त्यानंतर राज्य बोर्डाने बारावीचा निकाल जाहीर केला. आता दहावीचाही निकाल लागत आहे. विद्यार्थ्यांना त्यांचा निकाल mahresult.nic या वेबसाईटवर उपलब्ध होईल. याशिवाय आणखी काही वेबसाईटवर विद्यार्थ्यांना निकाल पाहता येईल.

## निवडक

### दिल्लीत हॉस्पिटलला लागलेल्या आगीत सात अर्भकांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** राजकोटमध्ये अग्नितांडव चालू असताना दुसरीकडे राजधानी दिल्लीतही शनिवारी (दि. २५) रात्री साडेअकराच्या सुमारास भीषण आगीची घटना घडली. दिल्लीच्या विवेक विहार परिसरातील न्यू बॉर्न बेबी केअर सेंटरला लागलेल्या आगीत सात नवजात अर्भकांचा मृत्यू झाला आहे. अग्निशमन दलाने रविवारी पहाटे ४च्या सुमारास आग आटोक्यात आणली.

### गोव्यात झोपड्यांवर बस धडकून चार मजुरांचा मृत्यू, पाच जखमी

**वेर्ना :** दक्षिण गोव्यात वेर्ना परिसरातील औद्योगिक वसाहतीमध्ये खासगी बसने रस्त्याकडेला उभारण्यात आलेल्या झोपड्यांना शनिवारी (दि. २५) रात्री ११.३०च्या सुमारास धडक दिली. या अपघातात चार जणांचा बळी गेला आहे तसेच पाच जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हे सर्व मजूर मूळचे बिहारचे रहिवासी असल्याचे सांगितले जात आहे. बसचालक मद्यधुंद होता.

## भारत दोन-तीन वर्षांत नक्षलमुक्त होणार -गृहमंत्री शाह

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशाचे गृहमंत्री अमित शाह यांचे नक्षलवादावर मोठे विधान समोर आले आहे. येत्या दोन-तीन वर्षांत देशातील नक्षलवादाची समस्या संपेल, असे शाह यांनी म्हटले आहे तसेच छत्तीसगडचा एक छोटा भाग वगळता संपूर्ण देश या धोक्यापासून मुक्त झाला असल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

पशुपतीनाथ ते तिरुपती या तथाकथित नक्षल कॉरिडॉरमध्ये नक्षलवाद्यांची उपस्थिती नाही, असे सांगून अमित शाह म्हणाले की, देशातून नक्षलवाद संपत आहे. कधीकाळी काही लोक पशुपतीनाथ ते तिरुपती या नक्षल कॉरिडॉरबद्दल बोलत असत. आता झारखंड पूर्णपणे नक्षलमुक्त झाले आहे. बिहार पूर्णपणे मुक्त झाला. ओडिशा, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशही पूर्णपणे मुक्त झाले आहेत. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशदेखील पूर्ण मुक्त झालेत.

छत्तीसगड पूर्णपणे मुक्त झालेला नाही आणि तेथे काही भागात नक्षलवादी अजूनही सक्रिय आहेत, कारण गेल्या पाच वर्षांपासून राज्यात काँग्रेसचे सरकार आहे. भाजप सरकारने पाच महिन्यांपूर्वी राज्यात सत्ता हाती घेतल्यापासून छत्तीसगडला नक्षलमुक्त करण्याचे काम सुरू केले आहे. आमचे सरकार आल्यापासून जवळपास १२५ नक्षलवादी मारले गेले आहेत. ३५२हून अधिक लोकांना अटक करण्यात आली आहे, तर १७५ जणांनी आत्मसमर्पण केले आहे, अशी माहिती अमित शाह यांनी या वेळी दिली.

आजची आकडेवारीही मोजली तर जवळपास २५० जणांनी आत्मसमर्पण केले आहे. इथे मी फक्त गेल्या पाच महिन्यांच्या आकडेवारीबद्दल बोलत आहे, असे म्हणत पुढील दोन किंवा तीन वर्षांत देश नक्षल समस्येपासून मुक्त होईल, असे शाह यांनी म्हटले.

### पुणे अपघात प्रकरणात नवा खुलासा

# अल्पवयीन मुलाच्या आईने चालकाला केली होती अपघाताची जबाबदारी स्वीकारण्याची विनंती

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे पोर्श कार अपघात प्रकरणात अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल होऊ नये म्हणून त्यांच्या चालकावर दबाव टाकण्यात येत होता. अपघात घडला तेव्हा तो स्टेअरिंगवर होता आणि अल्पवयीन मुलगा मागे बसला होता, असा जबाब दे अशी धमकी मुलाच्या वडिलांनी चालकाला दिली होती तसेच मुलाला सहीसलामत सोडण्याकरिता त्याच्या आईनेही चालकाकडे गयावया केली होती, असे वृत्त समोर आले आहे.

याबाबत माहिती देताना पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, आम्ही चालकाचा जबाब नोंदवला आहे. त्याने नमूद केले की, रविवारी पहाटे २.४५च्या सुमारास अपघातानंतर मुलाच्या वडिलांनी त्याला फोन करून बोलावले. अपघात झाला तेव्हा तो कारच्या स्टेअरिंगवर होता असे सांगण्यास चालकावर दबाव टाकण्यात आला होता. या वेळी बिल्डरच्या पत्नीनेही भावनिक होऊन त्याला अपघाताची जबाबदारी स्वीकारण्याची विनंती केली होती.



कुटुंबीयांनी चालकाला अपघाताची जबाबदारी घेण्यासाठी वेगवेगळी प्रलोभने दिली होती. अपघातानंतर अल्पवयीन मुलगा, त्याचे मित्र आणि चालकाला पोलीस ठाण्यात नेण्यात आले. सुरुवातीला चालकाने आपणच गाडी चालवत होतो असे सांगितले, पण त्यावर आम्ही विश्वास ठेवला नाही आणि अल्पवयीन मुलाविरोधात गुन्हा दाखल केला गेला, असे स्पष्ट करून पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले की, रात्री ११च्या सुमारास बिल्डर चालकाला सोडवून घेऊन गेला होता. त्याचा मोबाइल बिल्डरने स्वतःकडे ठेवला आणि त्याला मुलाच्या आजोबांनी डांबून ठेवले. आम्ही सांगू त्याप्रमाणे जबाब द्यायचा, असा दबाव टाकण्यात आला होता.

दुसर्‍या दिवशी चालकाची पत्नी आणि त्याच्या घरातील सदस्य अल्पवयीन मुलाच्या घरी गेले, तिथे त्यांनी आरडाओरड केली. त्यानंतर त्या चालकाला त्याचे घरातील लोक अल्पवयीन मुलाच्या घरून स्वतःच्या घरी घेऊन गेले. चालक त्याच्यावर टाकण्यात आलेल्या दबावामुळे घाबरला होता. चालकाला गिफ्ट आणि पैशांचे आमिष देण्यात आले होते, अशी माहिती मुलाच्या आजोबांना अटक केल्यानंतर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

# सुट्टीतील शेवटच्या वीकेण्डला समुद्रकिनारे गजबजले





**अलिबाग : प्रतिनिधी**

मे महिन्याच्या सुट्टीतील शेवटचा वीकेण्ड असल्यामुळे अलिबागमध्ये शनिवार व रविवारी पर्यटकांनी गर्दी केली होती. अलिबागप्रमाणेच रायगड जिल्ह्यातील इतरही समुद्रकिनारे पर्यटकांनी गजबजल्याचे दिसून आले.

अलिबाग, मुरूड हे दोन तालुके पर्यटकांना नेहमीच साथ घालत असतात. येथे राहण्याची आणि चमचमीत खाण्याची उत्तम सोय तर आहेच. शिवाय मुंबई-रेवस आणि गेटवे ते मांडवा जलवाहतूक सेवेमुळे पर्यटकांना प्रवास जवळचा व सोयीचा ठरतो, परंतु पावसाळ्यात २५ मे ते ऑगस्टअखेर प्रवासी जलवाहतूक सेवा बंद असते.

मे महिन्याच्या सुट्टीमुळे अलिबाग व परिसरातील पर्यटन गेली अनेक दिवस बहरले होते. विशेषतः समुद्रकिनार्‍यांवर पर्यटकांची विशेष गर्दी पहायला मिळाली. अलिबागसह किहीम, वरसोली, नागाव, काशीद, मुरूड येथे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी अनेक सोयीसुविधा उपलब्ध आहेत. बाईक रायडिंग, उंट सफर, कार रायडिंगबरोबरच खाण्या-पिण्याची व्यवस्था असल्याने पर्यटक मोठ्या उत्साहात सुट्टी घालवतात.

सध्या पावसाळा तोंडावर आला आहे. गेल्या काही दिवसांत अवकाळी पावसाने जिल्ह्यातील अनेक गावांना तडाखा दिला आहे. वातावरण बदलत असल्याने या वर्षी २५ मेपासून जलवाहतूक सेवा बंद करण्यात आली आहे. जे पर्यटक बोटीने काही दिवसांपूर्वी अलिबागेत आले त्यांचे रविवारी परतीच्या प्रवासाचे वांदे झाले. अखेर काही पर्यटक खासगी वाहनाने पनवेलपर्यंत गेले, तर काहींनी एसटी बसचा पर्याय निवडला. रविवार असूनही पर्यटक सकाळीच मुंबईकडे निघाल्याचे चित्र अलिबागेत पहायला मिळाले.

> **जलवाहतूक बंद झाल्याने तेथील प्रवासी एसटी स्थानकात आले. इतक्या प्रवाशांसाठी एसटी बसेसची व्यवस्था करणे शक्य नाही. तरी अलिबाग-पनवेल मार्गावर २०-२५ जादा बसेस सोडण्यात आल्या आहेत. पर्यटकांसाठी जास्तीत जास्त बसेस सोडण्याचा आमचा प्रयत्न आहे.**
> **-अजय वनारसे, व्यवस्थापक, अलिबाग एसटी बस आगार**

# आरटीई प्रवेशासाठी काढावी लागणार सोडत

## राज्यात उपलब्ध जागांपेक्षा अधिक अर्जांची नोंदणी

**पुणे : प्रतिनिधी**

राज्याच्या शालेय शिक्षण विभागातर्फे शिक्षण हक्क कायद्यातंर्गत (आरटीई) प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. यामध्ये आतापर्यंत एक लाख ४७ हजारांहून अधिक अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे आता शाळा प्रवेशासाठी सोडत काढावी लागणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

आरटीई अंतर्गत वंचित, आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश दिला जातो. त्यानुसार खासगी शाळांतील प्रवेशासाठीची अर्ज नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यंदा राज्यभरातील नऊ हजार १९७ शाळांमध्ये एक लाख चार हजार ७३८ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. ३१ मे ही अर्ज नोंदणीसाठीची अंतिम मुदत आहे. त्यामुळे आतापर्यंत आलेल्या एक लाख ४७ हजार अर्जांमध्ये आणखी अर्जांची भर पडणार आहे.

दरम्यान, अर्ज नोंदणीसाठी दिलेल्या मुदतीत किती अर्ज येतात याचा आढावा घेतला जाईल. त्यानंतर अर्ज करायचे राहून गेले असल्यास त्यांना संधी मिळण्यासाठी नोंदणीच्या मुदतवाढीचा विचार करण्यात येईल. मग प्रवेशासाठीची सोडत काढण्याचे नियोजन केले जाईल, असे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी सांगितले.

# इंडिया आघाडी कट रचतेय

## ■ उत्तर प्रदेशमधील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हल्लाबोल

**घोसी : वृत्तसंस्था**

देशातील लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी राजकीय पक्षांकडून जोरदार प्रचार सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही उत्तर प्रदेशातील घोसी येथे सभेला संबोधित केले. या वेळी नरेंद्र मोदींनीइंडिया आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला. पूर्वांचल गेल्या १० वर्षांपासून देशाच्या पंतप्रधानांची निवड करत आहे आणि पूर्वांचल गेल्या सात वर्षांपासून यूपीचे मुख्यमंत्री निवडत आहे, त्यामुळे पूर्वांचल हे सर्वांत खास असल्याचे नरेंद्र मोदींनी सांगितले.

घोसी, बलिया आणि सलेमपूरमधील लोक फक्त खासदार निवडत नाहीत, तर ते



पंतप्रधान निवडतात, असे नरेंद्र मोदी म्हणाले तसेच समाजवादी पार्टीवरही नरेंद्र मोदींनी निशाणा साधला. समाजवादी पार्टीने नेहमीच षड्यंत्राखाली मागासलेला राहिला, मात्र आता माफियांसाठी अश्रू ढाळणाऱ्यांना पाय ठेवू देणार नाही, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

सर्व जातींनी आपापसात लढावे अशी इंडिया आघाडीची इच्छा आहे. राजपूत, ब्राह्मण, राजभर, दलित, कायस्थ या सर्वांनी आपापसात लढून कमकुवत व्हावे. तुम्हाला प्रश्न पडला असेल की इंडिया आघाडीचा फायदा काय होईल? तर जेव्हा समाजातील लोक एकत्र नसतील तेव्हा तुमचे लक्ष खऱ्या मुद्द्यांवरून विचलित होईल, असे नरेंद्र मोदींनी सांगितले.

विरोधकांच्या इंडिया आघाडीवर निशाणा साधत नरेंद्र मोदी म्हणाले की, हे लोक त्यांचे मूळ तीन कट पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवत आहेत. एक म्हणजे संविधान बदलून भारतात धर्माच्या आधारावर आरक्षण असेल असे लिहिले जाईल. दुसरे म्हणजे, एससी, एसटी आणि ओबीसीचे आरक्षण रद्द करण्याचे आणि तिसरे म्हणजे मुस्लिमांना धर्माच्या आधारावर संपूर्ण आरक्षण देण्याची योजना आहे.

### *विरोधक राम मंदिरात त्रुटी शोधायला लागलेत*

***निवडणुकीच्या काळात इंडिया आघाडीचे लोक मंदिरांना भेटी देण्याचे नाटक करतात, पण ५०० वर्षांनंतर जेव्हा आपल्या आस्थेचा इतका मोठा क्षण आला तेव्हा त्यांनी राम मंदिराला शिव्या द्यायला सुरुवात केली आणि त्यात त्रुटी शोधायला लागले. राम मंदिराच्या उभारणीमुळे हे लोक प्रचंड नाराज झाले होते. ज्याप्रमाणे शाहबानोचा निर्णय रद्द करण्यात आला, त्याचप्रमाणे राम मंदिराबाबतचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णयही रद्द करण्यात यावा, असा दबाव हे लोक सातत्याने आणत आहेत, असेही नरेंद्र मोदी म्हणाले.***

---

# वीकेण्डमुळे माथेरान घाटरस्ता पर्यटकांच्या वाहनांनी हाऊसफुल्ल

**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान वाहनतळ येथील पार्कींगचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. वाहन पार्किंग फुल झाल्याने विकेंडला माथेरान घाटात पार्किंगपासून दोन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. दरम्यान, पोलिसांनी अथक प्रयत्नानंतर काही तासात ही वाहतूक कोंडी सोडवून पर्यटकांना दिलासा दिला.

थंड हवेचे ठिकाण म्हणून माथेरानची ओळख आहे. दरम्यान, शनिवार, रविवार विकेंडला माथेरानला येणाऱ्या पर्यटकांची संख्या फार मोठ्या प्रमाणात आहे. छोटे हिल स्टेशन म्हणून आणि मुंबई पुणे या शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेले हे ठिकाण म्हणून सर्वाधिक पसंती पर्यटक माथेरानला देतात, परंतु माथेरान फिरण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना गेली कित्येक वर्षे वाहन पार्कींगच्या समस्याला तोंड द्यावे लागत आहे. येथील अपुरी वाहन पार्किंग व्यवस्था येणाऱ्या पर्यटकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. रविवारी पर्यटकांचा लोंढा माथेरान दिशेने वळला होता. बारावीचे निकाल जाहीर झाले असून दहावीच्या निकाल सोमवारी (दि. २७) हाती होणार असल्यानेदेखील ही गर्दी वाढली असल्याचे बोलले जात होते.

माथेरान दस्तुरी नाका येथील वाहन पार्किंग सेवा नियोजन अभावी लवकरच फुल झाल्याने येणाऱ्या पर्यटकांची वाहने नेहमीप्रमाणे दस्तुरी वाहनतळ येथून ते गारबट जाणाऱ्या रस्त्यावर म्हणजेच साधारण अडीच किलोमीटर रांगा वाहनांच्या घाटात दिसत होत्या. घाटात झालेली वाहनांची ही गर्दी दोन्ही दिशेने जाणाऱ्या वाहनांना अडचण ठरत होती.



### ■ रस्त्याच्या कामांमुळे शहरात गर्दी

*माथेरान घाट तर नेरळ परीसरातदेखील पर्यटकांच्या वाहनांची गर्दी पाहायला मिळाली. विकेंड असतानादेखील कर्जत–कल्याण राज्यमार्गावर नेरळ या ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण होत होते. त्यामुळे एकेरी वाहतूक झाल्याने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. नेरळ–माथेरान हुतात्मा प्रवेशद्वार येथेच तिन्ही मार्गावर वाहनांची गर्दी होती. कर्जत बाजूकडे दीड किलोमीटर तर नेरळ शहर बाजूकडे दोन किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.*

त्यामुळे तासनतास पर्यटकांना आपल्या वाहनात अडकून पडावे लागले. काही पर्यटकांनी वाहनातून उतरून माथेरान गाठले तर काही तासानंतर वाहतूक कोंडी सुटल्यानंतर माथेरान दस्तुरी नाका येथे पोहचले होते. या वेळी नेरळ पोलीस व माथेरान पोलीस यांनी आपली कामगिरी चोख बजावली. आज बाहेरील पोलीस अधिकारी कदम हेदेखील माथेरान फिरण्यासाठी म्हणून आल्याने त्यांनादेखील या समस्येचा सामना करावा लागला.

नेरळ–माथेरान–नेरळ सेवा देणारे चालक यांनादेखील ह्या वाहम गर्दीचा सामना करावा लागला होता. त्यामुळे माथेरान दस्तुरी नाका येथील वाहनतळाची जागा वाढवण्याचे प्रशासनाने नियोजन केले गेले पाहिजे म्हणून पुन्हा एकदा मागणी पुढे आली आहे. अपुऱ्या जागे अभावी वाहन पार्किंग सेवा फुल होते आणि याचा फटका येणाऱ्या पर्यटकांवर होत आहे. बहुतेक पर्यटक हे खासगी वाहनाने माथेरान फिरण्यासाठी पसंत करतात. एक दिवसाची सुट्टी माथेरान येथे घालवून पुन्हा घरी जाण्यासाठी म्हणून पर्यटक माथेरान हे थंड हवेचे जवळचे ठिकाण म्हणून पसंती देत असून पर्यटकांना जर अशा अडचणी होत असतील तर माथेरानला पर्यटकांची होणारी गर्दी यामुळे कमी होईल, असेही येथील वाहनचालक व पर्यटक सांगत आहेत. वाहन कोंडी सोडवण्यासाठी सकाळपासून ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत पोलिसांना माथेरान घाटात अडकून पडावे लागले होते.

---

# जंजिरा किल्ला बंद केल्याने पर्यटकांचा हिरमोड

**मुरूड : प्रतिनिधी**

असंख्य पर्यटक रविवार असल्याने मुरूड येथे जंजिरा किल्ला पहाण्यासाठी आले होते, परंतु २६ तारखेपासून महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाकडून सर्व वॉटर स्पोर्ट्स व जलवाहतूक बंद करण्याचे आदेश दिले आहेत. पर्यटकांना शनिवारपासून जंजिरा किल्ला हा बंद करण्यात आल्याने असंख्य पर्यटकांची हिरमोड झाला. राज्यातून आलेल्या अनेक पर्यटकांची घोर निराशा झाली.

जंजिरा बंद करण्यात आल्याचे समजताच असंख्य पर्यटक माघारी फिरले आहेत. त्यामुळे हॉटेल व लॉजिंग व्यवसायाचे मोठे नुकसान झाले आहे. लाटांचे तांडव मोठ्या प्रमाणात सुरू झाल्याने व मोठ्या स्वरूपात



लाटा उसळू लागल्याने पर्यटकांच्या सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मेरिटाइम बोर्डाचे खोरा बंदर निरीक्षक प्रमोद राऊळ आणि पुरातत्व विभागाचे अधिकारी बजरंग येलीकर यांनी दिली.

समुद्रात लाटांचा उसळण्याचा वेग वाढला असल्याचे खोरा बंदर जेट्टीवरून शनिवारी दुपारी दिसून आले. जंजिरा जलदुर्गाजवळील प्रवेशद्वारावर पर्यटकांना उतरणे धोकादायक बनले आहे. कोणताही अपघात व विपरीत घटना घडू नये म्हणून किल्ला पूर्णतः बंद करण्यात आला आहे. आता जंजिरा किल्ला १ ऑक्टोबरपासून खुलला करण्यात येणार आहे.

---

# खोपोली–पाली मार्गावर अपघात; रिक्षाचालक ठार

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली–पाली मार्गावर कार आणि रिक्षा अपघातात रिक्षाचालक ठार झाला, तर रिक्षामधील दोन जण गंभीर जखमी झाले. त्यांना पनवेल येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अमित भोईर (वय ३०, रा. भिंगार पनवेल) असे अपघातात ठार झालेल्या रिक्षाचालकाचे नाव आहे.



रिक्षाचालकाला उपचारासाठी पनवेल येथे नेत असताना वाटेतच मृत्यू झाल्याची घटना घडली. हा अपघात दुपारी २ वा सुमारास घडला. पाली–खोपोली मार्गावरील गोंदाव फाटा येथे घडला. जखमी गणेश वाडेकर व अमित भाडे (रा. पनवेल) अशी जखमींची नावे आहेत.

---

# कोकण पदवीधर मतदारसंघासाठी भाजपची तयारी; मोठ्या प्रमाणावर पदवीधरांची नोंदणी

**कळंबोली : बातमीदार**

जून महिन्यात होणाऱ्या कोकण पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी महायुती व महाविकास आघाडी यांच्याकडून जोरदार प्रयत्न सुरू आहेत. मोठ्या संख्येने पदवीधर मतदारांच्या नोंदणीचे प्रयत्न सर्वच पक्षांकडून करण्यात आले आहेत, मात्र या मतदारसंघावर आजपर्यंत भाजपचे वर्चस्व दिसून आले आहे. मागील निवडणुकीत भाजपचे निरंजन डावखरे हे विजयी झाले होते. यावेळेसही भाजपने बूथ स्तरापासून मतदार नोंदणीची आखणी नियोजनबद्ध कार्यकर्त्यांकडून केली आहे.

पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, अन सिंधुदुर्ग असे पाच महाकाय जिल्हे मिळून कोकण पदवीधर मतदार संघ निर्माण करण्यात आलेला आहे. या मतदारसंघाची व्याप्ती आणि भौगोलिक स्थिती ही खूपच महाकाय अशी आहे. मागील निवडणुकीत या मतदारसंघावर भाजपचे निर्विवाद वर्चस्व दिसून आलेले आहे. कोकण पदवीधर मतदार संघ निर्माण झाल्यापासून वसंतराव पटवर्धन, अशोकराव मोडक संजय केळकर, त्यानंतर निरंजन डावखरे यांनी या मतदारसंघातून चांगल्या मताधिक्यांनी आपले वर्चस्व सिद्ध करून दाखवले आहे. तसे पाहता पदवीधर मतदारसंघाकडे अन्य पक्षांचा बघण्याचा दृष्टिकोन तितका काही रंजक असा दिसून आलेला नव्हता, मात्र आता या मतदारसंघाकडे सर्वच पक्ष आपले कसब पणाला लावून मतदारसंघावर आपली पकड साध्य करण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्टा करत आहेत.

सद्यस्थितीत भाजपकडून मागील निवडणुकीत निवडून आलेले निरंजन डावखरे यांनाच पुन्हा या मतदारसंघातून निवडणूकीमध्ये संधी मिळू शकते. त्यामुळे त्यांचे काम तळागाळातून ते वरच्या स्तरापर्यंत मोठ्या प्रमाणावर मतदार नोंदणी करून झालेले दिसत आहे. भाजपच्या बुथ स्तरावरून हजारो कार्यकर्त्यांनी मतदार नोंदणी मोठ्या संख्येने केलेली आहे तसेच या मतदारांपर्यंत पक्षाच्या बूथ स्तरापासून कार्यकर्त्यांकडून भ्रमणध्वनीवर संपर्क साधून याची सविस्तर माहिती ही दिली जात आहे. मतदार जनजागृती भाजपच्या कार्यकर्त्यांकडून मोठ्या प्रमाणावर होत आहे.

भाजपच्या कार्यकर्त्यांकडून कोकण पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीची तयारी या पाचही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेली आहे. महाविकास आघाडीच्या घटपक्षांकडून आपापल्या कार्यकर्त्यांची नावे या मतदार संघात निवडणूक लढवण्यासाठी जाहीर करून महाविकास आघाडीत अलबेल नसल्याचे एकंदरीत दिसून येत आहे. ठाकरे गटाच्या शिवसेनेकडून रायगड संपर्कप्रमुख किशोर जैन यांचे नाव जाहीर करण्यात आले आहे. तर काँग्रेसमधून काँग्रेसचे प्रदेश सचिव ॲड. प्रवीण ठाकूर हेही इच्छुक असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे महायुतीत काही आलबेल नसल्याचे दिसून येत आहे.

भाजपच्या वतीने राज्य पदवीधर प्रकोष्ट प्रदेश संयोजक धनराज विसपुते हे या मतदारसंघाचे काम पाहत असून सातत्याने कार्यकर्त्यांशी ते संपर्क ठेवून बैठकांचे सत्र ही अवलंबत आहेत. एकूण झालेल्या कामाची पाहणी झालेल्या मतदार नोंदणीची माहिती ते घेऊन राज्यस्तरावर देत आहेत. त्याचाही चांगला परिणाम या मतदारसंघांमध्ये निरंजन डावखरेंसाठी पुन्हा विधान परिषदेची दारे खुली करण्यास निश्चितच मदत फलदायी ठरू शकतो. या मतदारसंघात एक लाख ७७ हजारपेक्षा जास्त मतदान नोंदणी झालेली आहे. या अवाढव्य असलेल्या मतदारांपर्यंत नियोजनबद्धरितीने भाजपचे संपर्क अभियानही राबवले जात आहे. दहा ते पंधरा मतदारांसाठी एक कार्यकर्ता अशा रीतीने पूर्व रचना या पक्षाच्या स्तरावर संपूर्ण पाचही जिल्ह्यात राबवली जात आहे. त्यासाठी विविध नियोजन, क्लुप्त्या व डाव राजकीय स्तरावर आखले जात आहेत.

---

पान १ वरून

## संजय राऊतांच्या दाव्याचे राजकीय वर्तुळात पडसाद

दरम्यान, संजय राऊतांना आधी खोटे बोलायची सवय होती. आता ते व्यसन झालंय. आमच्या पक्षात मीठ कालवता येईल का हा प्रयत्न ते करीत आहेत, अशा शब्दांत भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी संजय राऊतांना लक्ष्य केले आहे.

संजय राऊतांनी आपल्या पक्षाची, आपल्या घराची काळजी करावी, आमचा पक्ष आणि हा देश मोदींच्या नेतृत्वाखाली चालेल. ४ जूननंतर संजय राऊतांचे थोबाड फुटलेले आपल्याला दिसेल, कारण योगी आदित्यनाथ यांनी देशाची गरज मोदी आहेत, देशाच्या भविष्यासाठी मोदींची गरज आहे हे जाहीर सभांमधून अगदी ठणकावून सांगितले आहे. त्यामुळे मोदी–योगी असे चित्र उभे करू नका. संजय राऊत भ्रमिष्ट झालेत म्हणून अशा प्रकारचे शोधून शोधून, काही काढून प्रसिद्धीत राहण्याचा आणि नौटंकी करण्याचा प्रयत्न करतात, या शब्दांत भाजपचे विधान परिषदेतील गटनेते प्रवीण दरेकर यांनी हल्लाबोल केला. दरम्यान, इतर काही नेत्यांनीही राऊतांना खडेबोल सुनावले आहेत.

---


# अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत भक्तांची गर्दी

**पाली : प्रतिनिधी**

संकष्टी चतुर्थीला रविवारी (दि. २६) अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत श्री. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पहाटे पासूनच दर्शनासाठी लांब रांगा लागल्या होत्या. श्री. बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली होती. श्री. बल्लाळेश्वरलादेखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. तसेच मंदिरा बाहेर रांगोळीदेखील काढण्यात आली.

रविवार तसेच उन्हाळी सुट्टी असल्याने श्री. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून व भारतातून पालीत हजारो पर्यटक व भाविक दाखल झाले. उन्हाळी सुट्ट्यांमुळेदेखील मोठ्या प्रमाणात भाविक बल्लाळेश्वराचे दर्शन घेत आहे. यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल होत असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत.

उन्हाळी सुट्ट्या तसेच लोकसभा निवडणुका संपल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रभरातून पर्यटक व भाविक रायगड जिल्ह्यात पर्यटनासाठी दाखल



होत आहेत. शिवाय पालीतून इतर पर्यटकदेखील दक्षिण रायगड व कोकणाकडे व पुणे मुंबईकडे जात आहेत. परिणामी पर्यटक व भाविकांच्या गाड्यांमुळे पालीत वाहतुक कोंडी होत आहे. पाली पोलीस व देवस्थानचे सुरक्षा रक्षक वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न करत आहेत, मात्र कोंड सोडविणे अवघड होत आहे.

भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लोजिंग बोर्डिंगवाले, पापड, लोणचे मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, सरबतवाले, छोटेमोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत आहे. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले आहेत. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरुप आले आहे. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीन चोख व्यवस्था करण्यात आली आहे. विविध वस्तूंनी भरलेली दुकाने व गर्दी यामुळे मंदिर परिसर गजबजलेला दिसत आहे. अनेक भाविक स्वतःची वाहने घेवून येत आहेत. तर काही लक्झरी किंवा खासगी बसेसने येतात. यामुळे पालीतील रस्त्यावर वाहतूक कोंडी होत आहे.

भाविक आवर्जून स्थानिक रानमेवा व इतर जिन्नस खरेदी करत आहेत. त्यामुळे या विक्रेत्यांचा धंदा सुद्धा चांगला होत असून त्यांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

**संकष्ट चतुर्थीनिमित्त येणारे भाविक दुकानातून खरेदी करतात. त्यामुळे धंदा चांगला होत आहे. जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत तरी भाविकांची गर्दी राहणार असल्याने समाधानी आहे.**
**–मनोज मोरे, व्यावसायिक, बल्लाळेश्वर मंदिर**

**बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी शुद्ध थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. नाममात्र दरात प्रसादालयामध्ये प्रसाद (भोजन) उपलब्ध आहे. सुसज्ज स्वच्छतागृहही उभारण्यात आले आहेत. त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही. ट्रस्ट तर्फे योग्य व्यवस्था करण्यात आली आहे.**
**–जितेंद्र गद्रे, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली**

---

# संकष्ट चतुर्थीनिमित्ताने भाविकांनी घेतले चिरनेरच्या महागणपतीचे दर्शन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात संकष्ट चतुर्थी निमित्ताने रविवारी (दि. २६) शासकीय सुट्टीचा दिवस असल्याने उरण, पनवेल, नवी मुंबईसह विविध ठिकाणच्या भाविकांनी चिरनेरच्या महागणपतीचे मनोभावे दर्शन घेतले. गणेशभक्तांनी पहाटे ४ वाजल्यापासूनच श्रींच्या दर्शनाला सुरुवात झाली होती. या वेळी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी अधिक गर्दी असतानाही भाविकांनी रांगेतच दर्शन घेणे पसंद केले होते.

उन्हाळ्यातील उष्णतेचा चढता पारा असतांनादेखील महिन्यातून एकदा येणाऱ्या संकष्ट चतुर्थीला रविवारच्या सुट्टीमुळे कित्येक ठिकाणचे भाविकांनी हजेरी लावली होती, तर



सकाळच्या सत्रात गावोगावच्या पायी दिंड्या चिरनेर महागणपती चरणी नतमस्तक होण्यासाठी दाखल झाल्या होत्या. संकष्ट चतुर्थीनिमित्त गावातील इतरत ग्रामीण नागरिक व महिलांना पालेभाज्या, कडधान्य, हार, फुले, मिठाईसह सौंदर्य प्रसाधने आणि विविध प्रकारच्या कलाकुसरीच्या वस्तू खेळणी आदीने मंदिर परिसराला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. त्यामुळे येथील स्थानिक ग्रामस्थांना व महिलांना लघु उद्योगाची संधी प्राप्त झाली आहे.

चिरनेर महागणपतीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना त्यांची मनोकामना पूर्णतःवास जात असल्याची अनुभूती येत असल्याने वर्षांवर्षे येथे येणाऱ्या भक्तगणात लक्षणीय वाढ होतांना दिसत असल्याचे येथील गणपती देवस्थानचे विश्वस्त संतोष ठाकूर यांनी सांगितले.

---

## दुखवटा

## ज्योती धोत्रे यांचे निधन


**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेत सहाय्यक आयुक्त म्हणून कारभार बजावलेल्या व सध्या पुणे महानगर पालिकेत सहाय्यक आयुक्त पदावर कार्यरत असलेल्या असलेल्या अधिकारी डॉ. ज्योती धोत्रे यांचे रविवारी (दि. २६) रोजी निधन झाले. हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांची प्राणज्योत मालवली. त्या ३५ वर्षांच्या होत्या. एक महिन्यापूर्वीच त्यांचा विवाह झाला होता. बाणेर येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# पनवेलमध्ये पाणीटंचाईचे संकट टळणार

## देहरंग धरण १० जूनपर्यंत देणार जलसंजीवनी

### महापालिकेचे नियोजन अन् पाण्याची काटकसर



**कळंबोली : बातमीदार**

राज्यात अनेक ठिकाणी पाण्याचे संकट वाढवले असताना पनवेल महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केलेल्या उत्तम नियोजनामुळे अन पाणी बचतीचे अन् काटकसरीचे नियम राबविल्यामुळे पनवेलकरांवर पाणीटंचाईच्या झळा या आगामी काळात बसणार नाहीत. पनवेलला पाणीपुरवठा करणाऱ्या देहरंग धरणातून नियोजनबद्ध पाणीपुरवठा केल्यामुळे बचत केलेल्या साठ्यातून देहरंग १० जून पर्यंत सतत पाणीपुरवठा देऊन पनवेलकरांना जलसंजीवनी देणार असल्याची आनंदाची लाट पनवेलचे पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख विलास चव्हाण यांनी सांगितले.

१९६०च्या दशकात पनवेलला पाणीपुरवठा करण्यासाठी बांधण्यात आलेला तलावाचे रूपांतरनंतर देहरंग धरणामध्ये करण्यात आले. हे धरण निर्माण केले त्या वेळेला असणाऱ्या पनवेलची लोकसंख्येला पुरेसा पाणीपुरवठा या धरणातून होत होता. अद्यापही देहरंग धरणातून पनवेलला पाणीपुरवठा करण्यात येतो. देहरंग धरण सहित महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडूनही पनवेलकरांना पाणीपुरवठा होतो, मात्र यावर्षीच्या असणारा हवेतील उष्मा आणि त्याने पाण्याचे झालेले बाष्पीभवन याचाही फटका धरणातील जलसाठ्याला बसलेला आहे, परंतु पनवेलसहित अन्य भागातील महिलांनी घेतलेल्या पुढाकारामुळे व त्यांनी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला केलेल्या सूचनांमुळे आठवड्यातून एक वेळा पाण्याची बचत करण्यात आली. देहरंग धरणातून व पनवेलकरांना पाणीपुरवठा करताना केलेल्या काटकसरीमुळे धरणातील पाणीपुरवठा हा १०जून पर्यंत होणार असल्याची व पनवेलकरांच्या हृदयात ओलावा निर्माण करणारी आनंदाचि बाब ही पनवेलच्या पाणीपुरवठा विभागाने सांगितली आहे. आठवड्यातून एक वेळा पाण्याची बचत केल्याने तब्बल एका वेळेस तीन लाख ५० हजार लिटर पाण्याची बचत ही जानेवारी महिन्या पासून करण्यात येत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याची बचत होऊन जलसाठा पुरेशा प्रमाणात सुरक्षित राखण्यात महापालिकेला यश आले आहे. त्यामुळेच देहरंग धरणातील पाण्याचा साठा हा १० जूनपर्यंत पनवेलकरांना जलसंजीवनी देणार आहे. त्याबाबतचे उत्तम नियोजन व सुनियोजन हे पनवेल महापालिकेचे पाणीपुरवठा विभागातील प्रमुख अधिकारी विलास चव्हाण यांच्याकडून केले गेले आहे.

जनतेच्या सहकार्यामुळेच आणि पाणी बचतीचे नियम महापालिकेबरोबरच जनतेनेही घालून घेतल्यामुळेच पाण्याचा साठा हा जून महिन्यातील दुसऱ्या आठवड्यापर्यंत होऊ शकत आहे. हे धरण म्हणजेच एक प्रकारचा पूर्वीच्या तलावच होता, परंतु त्याचे रूपांतर नंतर धरणामध्ये करण्यात आले. या धरणातील साठलेला गाळ काढण्याचे कामही गाळमुक्त शिवार योजनेतून करण्यात येणार आहे, परंतु धरणात असलेला पाण्याचा जलसाठा यामुळे ते शक्य होत नाही.

# उरण शहरातील मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे पूर्णत्वाकडे

**उरण : प्रतिनिधी**

उरण शहरातील मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे सुरू असून, आत्तापर्यंत पन्नास टक्के कामे पूर्णतःवास नेल्याचा दावा नगर परिषद प्रशासनाने केला आहे, मात्र शहरातील पाणी निचाऱ्याची समस्या कायम आहे. या पूर्वीही नालेसफाईनंतर शहरातील मुख्य रस्ते पावसाच्या पाण्याने ओसंडून वाहत असल्याचा उरणवासियांना अनुभव आहे.

उरण शहर परिसर अवघ्या तीन किमी अंतराच्या परिघाचा आहे. येथील मुख्य नाले अगदी मोजकेच आहेत. तरीही दरवर्षीच्या पावसात शहरातील गणपती चौक, स्वामी विवेकानंद चौक, पालवी हॉस्पिटल परिसर, कुंभारवाडा, ग्रामीण रुग्णालय मार्ग आदी ठिकाणी पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचत आहे. त्यामुळे या मार्गाने पायी चालत किंवा वाहनाने प्रवास करणे धोक्याचे बनत आहे. ही उरण शहरातील ठिकाणे एखाद तासाच्या पाण्यात तुडुंब भरतात.

नगर परिषदेकडून लाखो रुपये खर्च करून नालेसफाई केली जाते, मात्र ही समस्या कायमच आहे. या संदर्भात उरण नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी समीर जाधव यांना विचारले असता, उरण शहरातील मान्सूनपूर्व कामे व नालेसफाई सुरू करण्यात आली असून, त्यासाठी एजन्सी नेमण्यात आली आहे. शिवाय पन्नास टक्के कामे पूर्णतः वास नेली असल्याचे जाधव यांनी सांगितले.



# खारघर, कळंबोली प्रवेशद्वार रस्त्याचे कॉँक्रीटीकरण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेने खारघर आणि कळंबोली शहराच्या प्रवेशद्वाराजवळच्या रस्त्याच्या कॉँक्रीटीकरणाचे काम हाती घेतले आहे. हे कामे पावसाळ्यापूर्वी मार्गी लागावे लागणार आहे. नाहीतर थेट सायन-पनवेल महामार्गावरील वाहतूक यामुळे विस्कळीत होऊ शकते.

पनवेल महापालिका क्षेत्रातील खारघर आणि कळंबोली ही मुख्य शहरे आहेत. दररोज मोठ्या प्रमाणात वाहने या ठिकाणाहून ये-जा करतात. पावसाळ्यात या मार्गावर पडणारे खड्डे लक्षात घेता पालिकेने यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी हे रस्ते कॉँक्रीटीकरण करण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे कळंबोली शहरातील अंतर्गत रस्तेदेखील कॉँक्रीटीकरणासाठी मोठ्या प्रमाणात खोदकाम केले आहे. पावसाळा आणि वाहतूक कोंडी, रस्त्यावरील खड्डे हे समीकरण जुने आहे. त्यामुळे जर का पावसाळ्यापूर्वी हे कॉँक्रीटचे काम मार्गी न लागल्यास शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होईल.

खारघरमध्ये याची प्रचिती हिरानंदानी येथून जाणाऱ्या वाहनचालकांना येत आहे. त्यामुळे पावसाळ्याला काही दिवस शिल्लक असताना हे काम पूर्ण करण्याचे शिवधनुष्य पालिकेला पेलावे लागणार आहे. युद्धपातळीवर हे काम पूर्ण करावे लागणार आहे.

# सायबर चोरट्यांनी बँक खात्यातून परस्पर काढली ९८ हजारांची रक्कम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सायबर चोरट्यांनी इलेक्ट्रॉनिक्स साधनांचा वापर करून खारघरमध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीच्या बँक खात्यातून ९८,५०० रुपये परस्पर काढून घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

सायबर चोरट्यांनी आणखी एक लाख ७४ हजारांची रक्कम काढण्याचा प्रयत्न केला, मात्र या व्यक्तीने तत्काळ आपले बँक खाते बंद केल्याने सायबर चोरट्यांना ती रक्कम काढता आली नाही. खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार सुमित मुखर्जी (वय ४५) हे खारघर सेक्टर-१९ मध्ये कुटुंबासह राहण्यास असून गत २१ मे रोजी सायंकाळी अज्ञात सायबर चोरट्यांनी इलेक्ट्रॉनिक्स साधनांचा वापर करुन त्यांच्या खात्यातील ९८,५०० रुपये काढले. याबाबतचा ओटीपी त्यांच्या ईमेल आयडीवर आल्यानंतर त्यांना हा प्रकार निदर्शनास आला. त्यानंतर कुणीतरी त्यांच्या बँक खात्यातील रक्कम काढून फसवणुक करत असल्याचे मुखर्जी यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ आपल्या बँकेत संपर्क साधून बँक खाते बंद करण्यास सांगितले.

काही वेळानंतर मुखर्जी यांना पुन्हा एक मेसेज प्राप्त झाला, त्यात त्यांच्या खात्यामधुन एक लाख ७४ हजार रुपयांची रक्कम रिलायन्स रिटेल लि. वर गेल्याबाबतचा मेसेज आला, मात्र मुखर्जी यांनी आपले बँक खाते बंद केले असल्यामुळे त्यांच्या खात्यातून ही रक्कम गेली नाही. त्यानंतर मुखर्जी यांनी प्रथम टेली बँकींगकडे तसेच एनआरआय बँकींगमध्ये तक्रार दाखल केली. त्याचप्रमाणे एनसीआरपी पोर्टलवरसुद्धा फसवणुकीची तक्रार दाखल केली. २५ मे रोजी त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली.

# महिलेवर अत्याचार करून बदनामी करणाऱ्यावर गुन्हा

**पनवेल :** महिलेला ब्लॅकमेल करून तिच्यावर अत्याचार करताना काढलेले फोटो महिलेच्या पतीसह त्यांच्या नातेवाईकांना पाठविण्याचा प्रकार करणाऱ्याविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर परिसरात राहणाऱ्या एका विवाहित महिलेबरोबर एका व्यक्तीची मैत्री झाली. या ओळखीचा फायदा त्या व्यक्तीने महिलेचे फोटो काढले होते. हे फोटो पतीला दाखविण्याची भीती दाखवून त्याने तिच्यावर अनेकदा अत्याचार केले. त्या त्रासाला कंटाळून अखेरीस या महिलेने त्याला टाळण्यास सुरूवात केली, परंतु त्या व्यक्तीने महिलेचे फोटो तिच्या पतीसह नातेवाईकांना पाठविल्याने हा प्रकार उघडकीस आल्यावर महिलेने वाच्यता केली. त्यानुसार खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वृद्ध महिलेचे दागिने लुबाडले

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरात एका ८५ वर्षीय वृद्ध महिलेच्या गळ्यातील व हातातील सोन्याचे दागिने दोन अज्ञात व्यक्तींनी लबाडीने व त्यांची फसवणूक करून काढून घेतल्याची घटना घडल्याने ज्येष्ठ नागरिकांमध्ये भितीयुक्त वातावरण आहे.

प्रभावती साखरे (रा.मंगला निवास, गोडसे आळी) या भाजी घेवून महाराष्ट्र बँकेच्या समोर झाडाखाली बसल्या असताना दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या जवळ येऊन त्यांना पाणी पिण्यास देऊन व ५०० रुपये देऊन पैसे रुमालात ठेवण्यास सांगितले. चोरट्यांनी हातचलाखीने साखरे यांच्या हातामध्ये असलेल्या सोन्याच्या बांगड्या व गळ्यात असलेली सोन्याची माळ असा जवळपास तीन लाखांचा ऐवज काढून घेऊन ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# खानावळीला आग

**पनवेल :** एका खानावळीला अचानकपणे आग लागल्याची घटना कळंबोली वसाहतीमध्ये घडली आहे.

कळंबोली वसाहतीमध्ये सेक्टर १ परिसरात असलेल्या एका इमारतीमधील खानावळीला अचानकपणे आग लागली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी खानावळीतील हजारो रुपये किमतीचे साहित्य जळून खाक झाले आहे. या आगीची माहिती मिळताच कळंबोली वसाहतीमधील सिडकोच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी जावून आगीवर नियंत्रण मिळविले आहे.




**पनवेल : भाजपचे केळवणे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष हिरामण ठाकूर व दिघाटीच्या सरपंच रजनी ठाकूर यांची कन्या दिपिका हिचा विवाह सुकापूर येथील चेतन डुकरे याच्याशी झाला. या वेळी आमदार महेश बालदी, भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, महिला मोर्चा शहर अध्यक्ष राजेश्री वावेकर, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे आदींनी नवदाम्पत्याला शुभेच्छा दिल्या. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनी फोनवरून शुभेच्छा दिल्या.**

# कडक उन्हातही गुळाच्या चहाला मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उन्हाचा कडाका वाढताच शीतपेय पिण्यास प्राधान्य दिले जाते. शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी मसाला ताक, लिंबू सरबत, लस्सीचे अधिक प्रमाणात सेवन केले जाते, मात्र कडाक्याच्या उन्हाळ्यातही नागरिकांचे चहावरील प्रेम तसूभरही कमी झालेले नाही. कारण उन्हाचे चटके बसत असतानाही चहाप्रेमींची संख्या वाढतच आहे. त्यामध्ये विशेष करून चहाच्या वेगवेगळ्या प्रकारांना मागणी अधिक प्रमाणात आहे. अलीकडच्या काळात गुळाचा चहा पिणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे वाढत्या तापमानातही गुळाच्या चहाला मागणी वाढली आहे.

काही वर्षांपूर्वी चहा म्हटलं की, एकच प्रकारचा चहा ग्राहकांना माहीत होता, मात्र आता चहाचे अनेक प्रकार आहेत. वेगवेगळ्या चवीत हवा तसा चहा उपलब्ध आहे. ब्लॅक टी, आले, लिंबू, गूळ, ग्रीन टी, गवती चहा अशा फ्लेव्हमध्ये चहा उपलब्ध आहे. काही वर्षांपूर्वी टपरी हे एकमेव चहा मिळण्याचे ठिकाण होते. अनेक ठिकाणी हॉटेलमध्ये चहा मिळत असे, मात्र आता चहांची आकर्षक फ्रेंचायजी विकत घेऊन दुकाने थाटली जात आहेत. पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर शहरानंतर जव्हारसारख्या ग्रामीण भागातही हा ट्रेंड पाहायला मिळत आहे. कॉर्पोरेट लूक आणि प्रतिष्ठा आलेल्या चहाच्या व्यवसायातून अनेक तरुण आज रोजगार कमवत आहेत. तथापि, गुळाच्या चहाची मागणी आजही कायम असल्याचे दिसून येत आहे.



**चहा विक्रीत कोणतीही घट झालेली नाही. नागरिक चहा पिण्यासाठी अधिक प्राधान्य देतात, मात्र गुळाचा चहा पिण्यासाठी अधिक मागणी आहे. कारण साखरेच्या चहापेक्षा गुळाचा चहा आरोग्यास चांगला असतो.**

**-हाजी रियाज मेमन, चहा विक्रेता**

**गुळाला ग्रामीण भागात विशेष असे महत्त्व आहे. औषधी गुणधर्म असणारा, कॅलरीजने परिपूर्ण असण्याबरोबर पोटॅशिअम आणि मॅग्रेशिअमचे प्रमाण यात भरपूर असते. त्यामुळे शरीरासाठी गूळ अतिशय परिणामकारक असतो. शरीरातील उष्णता कमी करणे, यासाठी गूळ फायदेशीर ठरतो.**

**-डॉ. प्रशांत राजगुरू, वैद्यकीय अधीक्षक**

# विहिरीची साफसफाई

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्रीमद्रायगीरौ प्रतिष्ठानच्या वतीने भाताण येथील नंदाबारची म्हणजेच विहिरीची साफसफाई केली. गावातील वडिलोपार्जित वर्षानुवर्ष असलेल्या विहिरी त्या नादुरुस्त अवस्थेत होत्या त्या चिखलाने भरलेल्या होत्या. त्या विहिरींची पाहणी करून त्यांची सुव्यवस्थितपणे करून स्वच्छ करण्यात आल्या.

श्रीमद्रायगीरौ प्रतिष्ठानचा हेतू असा की ऐतिहासिक ठेवा जपण्याचा प्रयत्न करणे आणि त्याचा फायदा पुढच्या पिढीपर्यंत कायम टिकून ठेवणे याची माहिती नवीन पिढीला अवगत व्हावी म्हणून हे प्रतिष्ठान स्वच्छता मोहीम हाती घेत असते.

या प्रतिष्ठानमध्ये दोनशेहून अधिक महिला, पुरुष कार्यरत असून सर्व नोकरदार वर्ग आहे. आठवड्यातील एक सुट्टीचा वार कुठेही खर्च न करता समाजासाठी, स्वच्छता मोहिमेसाठी खर्च करत असतात आणि महत्त्वाचे म्हणजे स्वतःच्या खर्चाने ज्या ज्या ठिकाणी स्वच्छता मोहीम असेल त्या ठिकाणी स्वतःच्या खर्चाने जात असतात. या मोहिमेत ५० हुन अधिक प्रतिष्ठानचे सभासद सहभागी झाले होते. यात ग्रामपंचाययीचा महत्त्वाचा सहभाग लाभला.



# लंडनमधील निवडणुकीत पनवेलच्या भावेश पाटीलचा विजय

## विद्यार्थी संघटनेच्या उपाध्यक्षपदी निवड




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लंडनमधील रोहॅम्पटन विद्यापीठात अवघ्या पाच महिन्यांपूर्वी शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या पनवेलमधील रोडपाली गावातील भावेश पाटील या तरुणाकडे विद्यार्थ्यांचे नेतृत्व आले आहे. रोहॅम्पटन विद्यापीठातील विद्यार्थी संघटनेच्या उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत नुकताच विजय मिळवत, भावेश याने जगभरातील विद्यार्थी शिकत असलेल्या या विद्यापीठात आपल्या नेतृत्वगुणांचा ठसा उमटवला आहे.

रोडपाली गावचा रहिवासी असलेला भावेश एमबीएचे शिक्षण घेण्यासाठी जानेवारी २०२४मध्ये लंडनमध्ये गेला. रोहॅम्पटन विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या व्हाइटलँड कॉलेजमध्ये त्याने प्रवेश घेतला आहे. लंडनमधील रोहॅम्पटन विभागाच्या नावानेच या विद्यापीठाचे नाव ठेवण्यात आले आहे. कळंबोलीत शालेय शिक्षण झालेल्या भावेशने अन्य विद्यार्थ्यांप्रमाणेच पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले. त्याने कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचे नेतृत्व कधीही केले नव्हते, परंतु परदेशात शिक्षणासाठी गेल्यानंतर, जगभरातून आलेले विद्यार्थी मायदेशापासून, कुटुंबीयांपासून दूर मानसिक दडपणाखाली राहात असल्याचे त्याला दिसले.

या विद्यार्थ्यांच्या अडीअडचणीत आपण उभे राहिले पाहिजे, या भावनेने भावेश याने रोहॅम्पटन विद्यापीठाच्या विद्यार्थी संघटनेचे प्रतिनिधित्व करण्याचा निर्णय घेतला. अडीच वर्षांच्या शिक्षणासाठी अवघ्या पाच महिन्यांपूर्वी रोहॅम्पटन विद्यापीठाच्या कॅम्पसवर दाखल झालेल्या भावेशने मिळवलेल्या या यशाबद्दल आणि जनसंपर्काबद्दल त्याचे कौतुक केले जात आहे. भावेशने विद्यार्थी संघटनेची निवडणूक जिंकल्याने रोडपालीतील त्याचे कुटुंबीयही अचंबित झाले. भावेशच्या वडिलांनी आनंद साजरा केला.

### घरातूनच राजकारणाचे बाळकडू

**भावेशचे आजोबा महादेव पाटील हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष आहेत. पाटील कुटुंबातील सदस्यांनी जिल्हा परिषदेत प्रतिनिधित्व केले आहे. अशी पार्श्वभूमी असली, तरी स्वत: भावेश याआधी कधीच राजकारणात नव्हता, परंतु आता थेट लंडनमध्ये विद्यार्थी संघटनेच्या निवडणुकीत त्याने बाजी मारल्यामुळे कळंबोलीतील राजकीय वर्तुळातही चर्चा सुरू झाली आहे.**

## संपादकीय


# राऊतांचा बाष्कळ दावा

सातत्याने वादग्रस्त व अर्थहीन विधाने करणारे उद्धव ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी पुन्हा एकदा आपल्या अकलेचे तारे तोडले आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि अन्य भाजप नेत्यांबद्दल राऊत यांनी केलेल्या दाव्याचे साहजिकच राजकीय वर्तुळात पडसाद उमटले.

**संजय राऊत यांनी दै. सामनामध्ये लिहिलेल्या लेखात 'नितीन गडकरी यांचा नागपुरात पराभव व्हावा यासाठी मोदी-शाह-फडणवीसांनी एकत्र प्रयत्न केले. गडकरींचा पराभव होत नाही याची खात्री पटल्यावर फडणवीस हे नाइलाजाने नागपुरात प्रचारात उतरले. गडकरींच्या पराभवासाठी सर्व प्रकारची रसद फडणवीस यांनीच पुरवली हे संघाचेच लोक नागपुरात उघडपणे बोलताना दिसतात,' असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे आता भाजपचे सरकार आले, तर अमित शाह हे योगी आदित्यनाथ यांना घरी पाठवतील, असा दावाही राऊतांनी केला आहे. मुळात राऊत हे आपल्या अजब करामतींसाठी सर्वांना परिचित आहेत. ते कधी काय बोलतील, लिहतील आणि करतील याचा नेम नाही. त्यांच्याच 'सामना'मध्ये मराठा समाजाने काढलेल्या मूक मोर्चाला मुका मोर्चा म्हणून हिणवले गेले होते. कोपर्डी हत्याकांडातील आरोपींना शासन व्हावे यासाठी मराठा समाजातर्फे राज्यात अनेक ठिकाणी मूक मोर्चे निघाले. मराठा समाज न्याय हक्काच्या मागणीसाठी मूक मोर्चा काढत असताना त्या समाजाची आणि मोर्चात सहभागी माता भगिनींची अवहेलना, बदनामी करण्याच्या हेतूने २५ सप्टेंबर २०१६ रोजी मूक मोर्चाला मुका मोर्चा म्हणून हिणवत 'सामना'मध्ये व्यंगचित्र काढण्यात आले होते. यातून महिलांच्या आत्मसन्मानाला ठेच पोहचली. तरीही राऊतांचे वर्तन सुधारले नाही. उलट महाविकास आघाडीची सत्ता आणि उद्धव ठाकरे यांचे मुख्यमंत्रीपद गेल्यानंतर ते आणखी बिघडल्याचे दिसून येते. राऊत महाशय सकाळीच पत्रकारांना आपल्या निवासस्थानी बोलावून एखादी आवई उठवतात. स्वतःकडे चांगले सांगण्यासारखे नसले की अशा प्रकारे दुसऱ्याबाबत कंडी पिकवायची, म्हणजे आपले झाकून राहते हा जुनाच फंडा ते वापरतात, मात्र असे केल्याने त्यांचेच हसे होते. आताही तसेच होताना दिसत आहे. नितीन गडकरी हे भाजपच्या पहिल्या फळीतील नेते आहेत. त्यांच्याविषयी पक्षातील नेत्यांबरोबरच जनतेमध्येही आदराची भावना आहे. गडकरींनी रस्ते खात्याचे मंत्री म्हणून केलेली कामगिरी समस्त देशाने पाहिली आहे. सुसंस्कृत व्यक्तिमत्व, प्रचंड जनसंपर्क, कामाविषयी आस्था असा हा पक्षाचा स्टार नेता आहे. म्हणूनच त्यांच्यावर राष्ट्रीय अध्यक्षपदाचीही जबाबदारी सोपवली गेली होती. आजही त्यांच्या शब्दाला केवळ भाजपमध्येच नाही, तर अन्य पक्षांमध्येही मान आहे. असे असताना त्यांना खाली खेचण्यासाठी म्हणे मोदी-शाह-फडणवीसांनी एकत्र प्रयत्न केले. खरेतर ठाकरे गटाला गळती लागून नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते अन्य पक्षांमध्ये जात आहेत. पक्षाचे मूळ नाव, चिन्ह हातून गेले. आघाडीमध्येही आलबेल नाही. त्यामुळे आपले सारे झाकून ठेवण्यासाठी राऊत अशी विधाने वरचेवर करीत असतात, पण असे करून ते मूळ परिस्थितीपासून जनतेचे लक्ष्य विचलित करू शकत नाही. त्यांनी लक्षात ठेवावे जे दाबण्याचा, लपविण्याचा प्रयत्न कराल ते अधिक जोराने वर येईल. त्याऐवजी अशी वेळ आपल्या पक्षावर का ओढावली याचे आत्मचिंतन राऊतांसारख्या मंडळींनी केले पाहिजे; अन्यथा त्यांचा उरलासुरला पक्षही रसातळाला जायला वेळ लागणार नाही.**

# कर्जतमध्ये पाणीटंचाईग्रस्तांसाठी व्यवस्था





पाणी म्हणजे जीवन! कर्जत तालुक्यातील काही गावात मार्च महिन्यापासूनच पाणीटंचाईला तोंड द्यावे लागते. तरीही शासनाचे टँकर एप्रिल महिन्यापासून टंचाईग्रस्त गावे व वाड्यांना पाणीपुरवठा करतात. आमदार महेंद्र थोरवे यांनी कर्जत तालुक्यातील पाणीटंचाई समूळ नष्ट करण्यासाठी पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील यांच्या कडून भरीव निधी उपलब्ध करून घेतला आहे. त्या त्या गावातील पाणी योजना पूर्ण होण्यासाठी वेळ लागणार आहे, तर रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनीही आता धाबेवाडी येथून मोफत पाणीवाटपाची सुरुवात केलीय.

पंचवीसएक वर्षांपूर्वी कर्जत तालुक्यात भीषण पाणीटंचाई होती. रेल्वेपट्ट्यातील गावांमध्ये पाण्यासाठी वणवण करावी लागे. डिकसळ, चिंचवली आदी गावातील ग्रामस्थ लोकल गाडीने कर्जतला येत असत आणि स्टेशनवरून किंवा स्टेशननजीकच्या विहिरीतून पाणी भरून पुन्हा लोकलने आपले घर गाठत असत. कर्जत शहरातसुद्धा पाण्यासाठी अनेकांना कसरत करावी लागे. पळसदरी गावानजीक रेल्वेने वाफेच्या इंजिनात पाणी भरण्यासाठी बांधलेल्या तलावाच्या पाण्यावर कर्जत ग्रामपंचायतीच्या गावांना पाणी पुरविले जात असे. १९९२ साली नगर परिषद झाल्यानंतर शहरासाठी नवीन पाणी योजना करण्याच्या हालचाली झाल्या. दोन आकडी लोकसंख्या जास्त असल्याने ही कर्जत वाढीव पाणीपुरवठा योजना निधीसाठी अडकली होती, मात्र त्या वेळी नगराध्यक्ष धनंजय चाचड, प्रवीण गांगल यांच्याबरोबर अन्य नगरसेवकांनी पाठपुरावा केला व तत्कालीन मंत्री रवींद्र माने यांच्या प्रयत्नाने ही योजना पूर्ण निधीनिशी मंजूर झाली. त्या वेळी १३ कोटी १४ लाख रुपयांची योजना बारमाही वाहणाऱ्या पेज नदीच्या पाण्यावर पूर्ण झाली. पूर्ण होतानाही अनेक अडचणी आल्या. १९९९ सरकार बदलले, त्यामुळे त्यांचे निकष बदलले. अखेर वृत्तपत्राच्या उपक्रमाद्वारे या पाणी योजनेचा तब्बल सात वर्षे पाठपुरावा केला आणि ही योजना २३ एप्रिल २००६ रोजी लोकांसाठी प्रत्यक्षात

**खबरबात**
**विजय मांडे**

सुरू झाली व त्यांना स्वच्छ व पुरेसे पाणी उपलब्ध झाले. या योजनेचे उद्घाटन नगर परिषद करू शकली नाही. या निमित्ताने देशात एक इतिहास घडला. योजना शासनाने पूर्ण केली व विजयोत्सव वृत्तपत्राने लोकांच्या सहभागाने साजरा केला. २०३१पर्यंतच्या लोकसंख्येपर्यंत ही योजना होती, पण कर्जत शहराचा विकास इतक्या झपाट्याने झाला की दहा वर्षे आधीच म्हणजे २०२१मध्येच या योजनेचे पाणी कमी पडू लागले. आमदार थोरवे यांनी नेरळ पाणीपुरवठा योजनेसाठी ४० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून या योजनेचे भूमिपूजनसुद्धा केले असून कर्जत शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना व्हावी म्हणून ७० कोटी रुपयांचा निधी मिळावा याकरिता ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करीत आहेत.


ग्रामीण भागाची परिस्थिती फारच वेगळी होती. १९६० पूर्वी गावोगाव पाणीटंचाई असायची, मात्र कर्जतच्या पूर्व भागात टाटा कंपनीच्या वीज उत्पादन करून वाहणाऱ्या पाण्यावर राजनाला तयार केला आणि पिण्याच्या पाण्याचाच नव्हे; तर दुबार शेतीलाही भरपूर प्रमाणात पाणी मिळू लागले. तालुक्याच्या अन्य भागातही बंधाऱ्यांची निर्मिती झाली आणि पाणीटंचाईच्या झळा कमी झाल्या. तरीही १८ गावे आणि ६० आदिवासी वाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मागील वर्षी तालुक्यातील १६ गावे आणि ५६ आदिवासी वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या उद्भवणार असा संभाव्य पाणीटंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला होता.

या वर्षी तालुक्यातील खांड्स, ओलमण व वाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा चेवणे, नांदगाव, तुंगी, ढाक, पेठ, अट निड, अंत्रट वरेडी, मोग्रज, पिंगळस, धामणी, खानंद, अंभेरपाडा, मोहोपाडा, भोपळेवाडी, सुतारपाडा, गरुड पाडा अशा १८ गावांमध्ये पाणीटंचाईची परिस्थिती उद्भवणार आहे, तर तालुक्यातील ६० आदिवासी वाड्यांमध्ये पाण्याची टंचाई भासणार असल्याने तेथील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला, मात्र असे असले तरी दोन टँकर या सगळ्या कृती आराखड्याचा भार वाहत असतात. त्यामुळे पाणी समस्या बिकट होऊ लागते. ही पाणीटंचाई दूर करण्यासाठी आमदार महेंद्र थोरवे सरकारच्या माध्यमातून टंचाईग्रस्त गावे व वाड्यांना पाणीपुरवठा व्हावा म्हणून या खात्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांच्या माध्यमातून जल जीवन मिशनमधून नळ पाणीपुरवठा योजना तयार करण्यासाठी प्रयत्नशील आहेत, तर रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे स्वखर्चाने पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सरसावले आहेत. हे ही नसे थोडके!



## बदलते तंत्रज्ञान

### संशयास्पद कॉलपासून असे राहा सावधान!



दूरसंचार विभागाने गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये संशयास्पद कॉल घोटाळ्याबद्दल चेतावणी दिली होती. अलीकडेच अशा मोबाईल नंबरवरून अनेक वेळा कॉल आल्याने स्कॅमर्स पुन्हा त्याच पद्धतीचा अवलंब करीत असल्याचे उघडकीस आले. या कॉल्सवरील आधीच रेकॉर्ड केलेला संदेश ऐकू येतो. जेव्हा आपण दूरसंचार सेवा प्रदात्याला कॉल करतो तेव्हा ऐकतो त्यासारखाच हा रेकार्डेट आवाज वाटतो, ज्यामुळे लोकांना ही खरी माहिती आहे असे वाटते.

अशा संशयास्पद नंबरवरून कॉल येत असेल तर घाबरू नका. असे नंबर ब्लॉक करण्याचा सल्ला दिला जातो, कारण ते फसवणूक करण्यासाठी तुमची वैयक्तिक आणि आर्थिक माहिती काढून टाकण्याचा प्रयत्न करतात. हा स्वयंचलित कॉल डिस्कनेक्ट होण्यापूर्वी ४४ सेकंद चालतो. स्कॅमरचा संदेश (इंग्रजी आणि हिंदीमध्ये) वापरकर्त्यांना ग्राहक हेल्पलाइनच्या इंटरएक्टिव्ह व्हॉइस रिस्पॉन्स प्रमाणेच '९ दाबा' असे सांगण्यास करण्यास प्रवृत्त करतो.

या संशयास्पद कॉलमध्ये प्री-रेकॉर्डेड व्हॉईसचा दावा आहे की, तुमच्या नावावर नोंदणीकृत सर्व मोबाईल नंबर येत्या दोन तासांत डिस्कनेक्ट केले जातील. वास्तविक, दूरसंचार विभाग नागरिकांना असे कॉल करीत नाही आणि सेवा बंद करण्याची धमकी देत नाही. त्यामुळे अशा स्कॅमर्सना कॉलवर किंवा अन्यथा कोणताही वैयक्तिक तपशील शेअर करू नये. अशा प्रकारच्या दाव्यांना ग्राहकांनी बळी पडू नये आणि की-पॅडवरील कोणतीही बटण दाबू नये आणि कॉल रद्द करू नये असा सल्ला दिला जातो.

दूरसंचार विभाग वापरकर्त्यांना त्यांच्या दूरसंचार सेवा प्रदात्याकडून अशा दाव्यांची सत्यता पडताळून पाहण्यासाठी आणि अधिकृत चॅनेलद्वारे (अधिकृत वेबसाइट किंवा ऑफलाइन स्टोअरवरील संपर्क क्रमांक) कंपनीशी संपर्क साधण्याचासल्ला देखील देते. असे कोणतेही दावे अत्यंत संशयास्पद आणि नागरिकांना फसवण्याचा प्रयत्न मानले जातील. अशा कोणत्याही कृतीतून तुमची फसवणूक झाल्यास cybercrime.gov.inवर तक्रार करा. सुरक्षिततेचा उपाय म्हणून तुम्ही तुमच्या संपर्क सूचीमधून असे नंबर ब्लॉक करू शकता आणि तक्रार करू शकता. याशिवाय आकर्षक अर्धवेळ नोकऱ्यांचे आश्वासन देणारे तत्सम स्कॅम कॉल्स आणि मेसेजेसलाही बळी पडू नका.

# विकासपुरुष केंद्रीय मंत्री नितीन गडकरी



**निमित्त**

उत्कृष्ट कल्पना आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोन असलेला द्रष्टा, निकाल मिळविण्यावर विश्वास ठेवणारा सक्षम प्रशासक, पक्ष कार्यकर्त्यांसाठी एक प्रतिष्ठित नेता, विरोधी पक्षात असताना सरकारला हाताशी धरणारा विरोधी पक्ष नेता आणि सत्तेवर असताना विकासपुरुष... नितीन गडकरी यांच्या व्यक्तिमत्त्वाला उत्तम प्रकारे आणणारे शब्द मंत्री म्हणून उत्कृष्ट कामगिरी करतात. दुसऱ्या शब्दांत, इथे लोकशाही घडवण्याची, वितरित करण्याची क्षमता असलेला नेता आहे! आज त्यांचा वाढदिवस.

एक अदम्य नितीन गडकरी ज्यांच्यासाठी राजकारण हे सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे साधन आहे ते केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग तसेच जहाजबांधणीमंत्री आहेत. गडकरी हे महाराष्ट्राच्या विदर्भातील नागपुरातून लोकसभेवर निवडून येतात. हा पूर्वी काँग्रेसचा पारंपरिक बालेकिल्ला, पण गडकरी यांनी सात वेळा विजेते विलास मुत्तेमवार यांचा सुमारे तीन लाख मतांच्या फरकाने पराभव केला.

वचनबद्ध अनुयायांमधून जागतिक दर्जाचे नेते घडवून इतिहास रचणाऱ्या स्व. भाऊराव देवरसांच्या स्मरणार्थ चारित्र्य, सामर्थ्य आणि कृतीची केंद्रित दिशा निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी नितीन गडकरी यांनी एक संस्था स्थापन करण्याचा विचार सुरू केला.

नितीन गडकरी यांचा जन्म २७ मे १९५७ रोजी महाराष्ट्रातील नागपूर शहरात एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात झाला, जे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालयदेखील आहे. गडकरींच्या आईचा त्यांच्यावर खूप प्रभाव राहिला आणि त्यांनी त्यांच्यामध्ये सामाजिक कार्याची भावना रूजवली. समाजाच्या सर्व घटकांच्या कल्याणासाठी काम करण्याच्या निःस्वार्थ प्रेरणेने आरएसएस आणि राष्ट्र उभारणीच्या मिशनद्वारे त्यांना त्यांच्या सुरुवातीच्या जीवनात प्रेरणा मिळाली.

जून १९७५मध्ये इंदिरा गांधींनी आणीबाणी लादणे हा गडकरी यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट होता आणि त्यांनी कायद्याचा सराव करण्यापेक्षा देशसेवेसाठी आपले जीवन समर्पित करण्याचा निर्णय घेतला. गडकरी यांनी एमकॉम, एलएलबी आणि डिप्लोमा इन बिझनेस मॅनेजमेंट (डीबीएम)चे शिक्षण घेतले आहे.


गडकरी यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे विद्यार्थी नेते म्हणून राजकारणात प्रवेश केला आणि नंतर भाजपची युवा शाखा असलेल्या जनता युवा मोर्चामध्ये सहभागी झाले. तो स्वतःला करिअर राजकारणी मानत नाही, तर राजकारणाला समाजसेवा मानतात. गरीबांसाठी, समाजासाठी आणि दलितांसाठी प्रकल्प सुरू करतो.

गडकरी हे १९८९पासून महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य राहिले. १९९९-२००५पर्यंत ते महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेतेही होते. २००९पर्यंत त्यांनी महाराष्ट्र प्रदेश भाजपचे प्रदेशाध्यक्ष म्हणून नेतृत्व केले जेव्हा त्यांना भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून पदोन्नती करण्यात आली आणि ते पक्षाचे सर्वांत तरुण अध्यक्ष बनले.

१९९५ ते १९९९दरम्यान ते महाराष्ट्रात सार्वजनिक बांधकाम मंत्री होते, जेव्हा त्यांना पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेत पूर्ण केले. त्यांनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग बांधला. याशिवाय अनेक रस्ते, पूल बांधले.

गडकरी यांच्याकडे सशक्त भारताची दृष्टी आहे आणि २१व्या शतकातील राजकारण हे प्रगती आणि विकासाचे राजकारण आहे, असा त्यांचा ठाम विश्वास आहे. त्यांचे लक्ष नेहमीच कर्तृत्वावर असते. त्यांनी अनेक प्रतिष्ठित कार्ये विक्रमी वेळेत पूर्ण केली आहेत. आज देशातील एक दूरदृष्टी असलेला नेता म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा! (साभार : इंटरनेट)


**क्लिक...क्लिक...!**



**कोलंब (गोवा) : दक्षिण गोव्यातील निसर्गरम्य बटरफ्लाय बीच पर्यटकांना आकर्षित करतो. तेथे बोटीने जाता येते.**

## आरोग्य प्रहर

### स्क्रीनकडे बघून डोळे सतत कोरडे होत असल्यास...



कोरोना साथीच्या काळात मोठ्यांपासून ते अगदी लहान मुलांमध्ये स्क्रीनकडे पाहण्याच्या वेळेत प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे आजच्या डिजिटल युगात अगदी अभ्यासापासून ते ऑफिसच्या कामानिमित्त प्रत्येकाला मोबाइलची गरज पडते. त्यामुळे स्क्रीनकडे दीर्घकाळ टक लावून पाहणे आता अगदीच सामान्य गोष्ट झाली आहे, पण यामुळे डोळे कोरडे पडण्याच्या किंवा इतर अनेक समस्यांना सर्वांनाच सामोरे जावे लागत आहे. या समस्येलाच ड्राय आय सिंड्रोम' असे म्हणतात.

स्क्रीन, एअर कंडिशनिंगच्या दीर्घकाळ संपर्कामुळे अनेक व्यक्तींना अस्वस्थता, जळजळ आणि दृष्टिदोषाचा त्रास होऊ लागतो. इन्स्टाग्रामवर कंटेन्ट क्रिएटर लन मँडेल याने या समस्येवर एक उपाय सुचविला आहे. हा उपाय म्हणजे तुम्हाला फक्त एका मिनिटासाठी तुमचे डोळे मिचकवायचे आहेत. जेव्हा आपण स्क्रीनकडे बराच वेळ एकटक पाहतो, तेव्हा डोळे कमी लुकलुकतात. यामुळे डोळे कोरडे होतात व जळजळ होते.

डोळ्यांची उघडझाप (मिचकावणे) या व्यायामाचा काळजीपूर्वक सराव केल्याने मेबोमियन ग्रंथी उघडू शकतात. पापण्यांच्या वरच्या बाजूला आणि खालच्या बाजूस असलेल्या लहान तेल-उत्पादक ग्रंथी आपल्या डोळ्यांसाठी आवश्यक आहेत. डोळे मिचकावण्याचा हा सोपा उपाय डोळ्यांच्या पृष्ठभागावर अश्रू समान रीतीने पसरण्यास मदत करते आणि त्यामुळे कोरडेपणा, जळजळ, अस्वस्थता टाळता येते.

दैनंदिन दिनचर्येत या व्यायामाचा समावेश करून पाहा. काही सेकंदांसाठी हळूवारपणे डोळे बंद करा. नंतर डोळे उघडा आणि फक्त डोळे मिचकावणे सुरू करा. तुमच्या डोळ्यात थोडे पाणी येईल आणि यामुळे दिवस चांगला होण्यास मदत होईल.

अथ्रेया सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील वरिष्ठ सल्लागार नेत्रविज्ञान नव्या सी. मंडेल यासुद्धा या उपायाशी सहमत आहेत. त्या म्हणाल्या की, डोळ्याच्या पृष्ठभागावर अश्रू समान रीतीने पसरवून डोळ्यांचे आरोग्य राखण्यासाठी डोळे मिचकावणे हे महत्वपूर्ण भूमिका बजावते, ज्यामुळे चिडचिड दूर होते.

डोळे लुकलुकल्याने अश्रू ग्रंथीमधून अश्रू स्राव सुलभ होतो. त्यामध्ये ओलावा आणि आवश्यक प्रथिने असतात, जी डोळ्यांच्या पृष्ठभागाचे संरक्षण करतात आणि कोरडेपणाचा सामना करतात. तथापि, गंभीर लक्षणांकडे दुर्लक्ष करून फक्त डोळे मिचकावण्याच्या व्यायामावर जास्त अवलंबून राहिल्याने अपुरा उपचार होऊ शकतो. संभाव्यतः स्थिती अधिक गंभीर होऊ शकते. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घेणेही फायदेशीर ठरू शकते.

# टंचाईग्रस्त गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील सहा गावे आणि १२ वाड्या यांच्यात पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत असून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असल्याची माहिती गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी दिली.

नेहमीच येतो उन्हाळा आणि सुरू होते पाणीटंचाई ही बाब नित्याचीच झाली आहे. रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात नवी मुंबई महापालिका व पनवेल महापालिका येथील कामोठे व खारघर विभागांना पाणीपुरवठा करणारे मोरबे धरण आहे. त्याचप्रमाणे भिलवले, कलोते, डोणवत येथे राज्य सरकारची लघु पाटबंधारे विभाग यांची धरणे असून खरसुंडी येथे वळण बंधारा आहे, जिल्हा परिषदेची लघु पाटबंधारे विभाग यांचीही छोटी धरणे आहेत. तरीही सालाबादप्रमाणे काही गावांना, वाड्याना पाणीटंचाई जाणवत असते. उसरोली, जांबरुंग, गोरठण बु., बीड खुर्द, वावोशी व चिलठण या सहा गावांबरोबर उंबरविरा ठाकुरवाडी, खडई वडी, परखंदे धनगरवाडी, वावोशी मल्हारनगर, वावोशी भीमनगर, नागेश्वर आदिवासीवाडी, गोळेवाडी, खरिवली आदिवासीवाडी, रानसई आदिवासीवाडी, माणिकनगर तळवली कातकरवाडी, तळवली दांडवाडी (या दोन वाड्या खालापूर नगरपंचायत यांच्या हद्दीत येतात, येथे जनावरे नाहीत असा शेरा आहे.) आणि नारंगी दत्तवाडी अशा बारा वाड्या पाण्यापासून बेचैन झाल्या आहेत. १६ एप्रिल २०२४ रोजी नारंगी दत्तवाडी येथे १२ हजार लीटर क्षमतेचा पहिला टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला.

या ठिकाणी ४०६ लोकसंख्या व ६० जनावरांची नोंद आहे, तर उंबरविरा ठाकूरवाडी येथे टँकर जाण्यासाठी योग्य दळणवळण साधन नसल्याने पीकअपद्वारे पाणीपुरवठा होत असून दोन हजार लिटर पाणी पिकअपद्वारे पुरविले जात असून पीकअप दिवसातून दोन वेळा जात आहे. ग्रुप ग्रामपंचायत वावले यांनी त्यांच्या हद्दीतील खैराट धनगरवाडी, ठाकुरवाडी व कातकरी वाडी या वाड्यांना पाणीपुरवठा करण्याची मागणी केली आहे, तर ढेबेवाडी येथील टंचाईबाबत चौकशी सुरू आहे. २२ मे २०२४ रोजी वावोशी मल्हारनगर, वावोशी भीमनगर, नागेश्वर आदिवासी वाडी, गोळे वाडी व खरीवली आदिवासी वाडी येथे पाणीपुरवठा सुरू झाला. पाणीटंचाईसंदर्भात क्षेत्रीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक यांना पाणीटंचाई परिस्थितीबाबत नियमित अवगत करण्याच्या सूचना दिल्या आहेत असे गटविकास अधिकारी (प्रथम श्रेणी) संदीप कराड यांनी सांगितले.

# खोपोली आणि खालापूरमध्ये मान्सूनपूर्व कामांची लगबग सुरू

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासुन पावसाळी वातावरण तयार होत आहे. हवामान खात्याकडूनही मान्सूनचे दोन तीन दिवस अगोदर आगमन होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. यापूर्वीच मागील आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे नागरिक हवालदिल आहेत. या पार्श्वभूमीवर खालापुर-खोपोलीत मान्सूनपूर्व कामांना जोरदार सुरुवात झाली आहे.

या कामांत बांधकाम क्षेत्राकडून सिमेंटसह इतर किमती साहित्य ठेवण्यासाठी तात्पुरते छत निर्माण करणे, वीट भट्टीवाल्यांकडून ताडपत्रीचे आछादन बनविन्याची कामे, सामान्य नागरिकांकडून घरांच्या छतांची डागडुजी करून घेणे, विविध सरकारी यंत्रणाकडून रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची कामे, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्याच्या बाजूला पाणी निचरा होण्यासाठी चर काढणे, विजवितरण कंपनीकडून अडथळा निर्माण होणाऱ्या झाडांच्या फांद्या काढणे, काही मोठी झाडे छाटणे, विद्युत ताराची देखभाल करून घेणे अशा सर्व कामांची जोरदार सुरुवात झाली आहे.

पाऊसाची चाहूल लागल्यावर सर्वच क्षेत्रांत आपआपल्या स्तरावर मान्सून पूर्व कामे पूर्ण करण्याची लगबग सुरू आहे. नगरपालिका, ग्रामपंचायतीकडून गटारी व नालेसफाईची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत.



**खोपोली शहर विजवितरण कंपनी अंतर्गत सर्व भागांत मान्सूनपूर्व सर्व प्रस्तावित कामांना सुरुवात करण्यात आली आहे. यासाठी काहीवेळा विद्युतपुरवठा बंद ठेवण्यात येत आहे. पावसाळी हंगामात कमीतकमी वीज खंडित होण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना व दुरस्ती व देखभालीची कामे केली जात आहेत.**

**–डी. बी. मोहिते, अभियंता, खोपोली वीज वितरण कंपनी**

**खोपोली नगरपालिका क्षेत्रात मान्सूनपूर्व कामे वेळेत होत आहेत. नालेसफाई व गटारे स्वच्छता होण्यासाठी नियोजनबद्ध कामांची आखणी करण्यात आली आहे. त्यानुसार कामे प्रगतीपथावर सुरू आहेत.**

**–डॉ. पंकज पाटील,** मुख्याधिकारी, खोपोली नगरपालिका

# पेणमधील कासमाळ येथे गाडीने घेतला पेट

**पेण : प्रतिनिधी**



पेण तालुक्यातील कासमाळ येथे पर्यटनासाठी जाणाऱ्या पर्यटकांच्या गाडीने पेट घेतल्याची घटना घडली. या घटनेत चालक व त्याच्या मित्रांनी प्रसंगवधान राखत गाडीतून बाहेर पडल्यामुळे मोठी दुर्घटना टळली आहे. या घटनेत संपूर्ण गाडी जळून खाक झाली आहे.

याबाबत माहिती अशी की, पेणमधील जयकुमार विश्वास हा त्याचे मित्र कुणाल म्हात्रे व अभिषेक बरवा, अनिल बरवा यांच्या समवेत शनिवारी (दि. २५) सायंकाळच्या सुमारास रेनॉल्ट कंपनीची क्विड गाडी (एमएच ०५ सीएम ७०५२) यामधून कासमाळ येथे पर्यटनासाठी जात असताना इराणी येथे गाडी चढणीवर गाडीच्या बोनेट मधून अचानक धूर येऊ लागला व क्षणार्धात गाडीने पेट घेतला. गाडी संपूर्ण जळून खाक झाली.

या वेळी जयकुमार विश्वास व त्याचे मित्र प्रसंगवधान राखत गाडीतून बाहेर आले. या दरम्यान, पेण नगर परिषदेच्या अग्निशमन विभागाला पाचारण करण्यात आले. या वेळी अग्निशमन दलाच्या पथकाने आगीवर नियंत्रण मिळविले, परंतु तोपर्यंत संपूर्ण गाडी आगीच्या भक्ष्यस्थानी पडली होती.

या वेळी पेण पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. याबाबत पेण पोलीस ठाण्यात आकस्मिक आग रजि. क्र. ३/२४नुसार नोंद करण्यात आली असून अधिक तपास पोलीस हवालदार प्रशांत पाटील हे करीत आहेत.

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत असणारे वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी शनिवारी (दि. २५) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३३६ व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली.

यामध्ये सीटबेल्ट न लावणे, हेल्मेट न घालणे असे विविध वाहतूकीचे नियम भंग केल्याप्रकरणी त्यांच्याकडून २,२७,१०० रुपये इतका दंड आकारला आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E-TENDER NOTICE (3rd Call)

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/ 3rd Call /Tender No.-09/ 2024-25 Dt:-08.05.2024 RFx No.7000031161 | **Sub:-** 3rd Call for SRM E-Tender Restoration and Maintenance of the SECURITRON Make Fire Detection and Alarm System provided at 220 kV Kandalgaon SS, 100 kV Roha SS & 100 kV Mhasala SS under EHV (O&M) Division Mahad. | **Rs.17,39,204/- (Including GST + 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- plus GST.
Bid submission is from 27.05.2024 @ 00:00 hrs to 02.06.2024 @23:59 Hrs for above tender
For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in.**
**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**


# कर्जतमध्ये नव्या प्रशासकीय भवनात कामकाज सुरू




**कर्जत : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नवीन प्रशासकीय कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले होते. आता नवीन प्रशासकीय भवनात कामकाज सुरू झाले आहे. या कार्यालयात तहसील कार्यालय व उप विभागीय कार्यालय सुरू करण्यात आले आहे.

टेकडीवर तहसील कार्यालय असल्याने शहराप्रमाणे ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात विविध कामांसाठी नागरिक येत असतात. टेकडीवर कार्यालय असल्याने गोरगरिबांना रिक्षाने यावे लागते. तर काही स्वतःच्या खासगी वाहनाने येतात. एका कामांसाठी तासन्तास जात असल्याने काम होईपर्यंत उपाशी पोटी थांबावे लागते. तहसील कार्यालयात सर्वच स्तरातील नागरिक येतात.

उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, शबरी योजना, निराधार योजना, राजीव गांधी योजना, फ्लॅट, जमीन जागेचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी, स्टॅम्प भरण्यासाठी तर काही तक्रार देण्यासाठी असे विविध कामांसाठी वयस्कर (वयोवृध्द), विद्यार्थी, महिला वर्ग येत असतात.

उपविभागीय कार्यालय श्रीराम पुलापलीकडे असल्याने नागरिकांना उलटा फेरफटका मारावे लागत असल्याने पैसा आणि वेळ जात आहे. यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी शासन दरबारी प्रस्ताव मांडून सर्व प्रशासकीय कार्यालय हे एकाच ठिकाणी आणण्यासाठी मंजुरी मिळवली. त्याप्रमाणे हाकेच्या अंतरावर पोलीस ठाण्यासमोर प्रशासकीय भवन उभारण्यात आले. त्याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले होते.

लोकसभा निवडणुकीदरम्यान तहसील कार्यालय, उपविभागीय कार्यालय, पाटबंधारे विभागाचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी असे सर्व प्रशासकीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांचे कामकाज नवीन प्रशासकीय इमारतीत निवडणुकीचे काम सुरू होते. मतदान झाल्यावर तहसील कार्यालय आणि उपविभागातील सर्व फाईल, सामान हलविण्याचे काम सुरू केले आणि यापुढे प्रशासकीय कार्यालयात सारा कारभार होणार आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

एकाच ठिकाणी कार्यालय येणार असल्याने कामानिमित्त येणाऱ्यांची दमछाक होणार नाही. छोटी मोठी सर्व कामे लवकर होतील. याठिकाणी प्रशस्त पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रशासकीय भवन जवळ भूमी अभिलेख कार्यालय आहे तसेच पोलीस ठाणे असल्याने आपोआप नियंत्रण राहणार आहे. याचबरोबर लोकांचा पैसा व वेळ वाचणार आहे.

# फणसाड अभयारण्यात सर्वे येथे उभारण्यात येणार नवीन प्रवेशद्वार

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील सुपेगाव परिसरात ५४ चौरस किलोमीटर क्षेत्रात फणसाड अभयारण्याचा विस्तार आहे. घनदाट जंगल व उंच अशी निलगिरीची झाडे यामुळे येथे नेहमी थंड वातावरण असते. सध्या सुपेगाव येथे फणसाड अभयारण्याचे एकच प्रवेशद्वार सुरू होते, परंतु आता सर्वे येथे दुसरे एक प्रवेशद्वार बनविण्यात येणार आहे. काशीद येथे असंख्य पर्यटक येत असतात. त्यांना सहजपणे फणसाड अभयारण्य पहाता यावे यासाठी सर्वे येथे प्रवेशद्वार बनवण्यात येत आहे. याचे काम अंतिम टप्प्यात असून पायवाट बनवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती फणसाड अभयारण्याचे वन परिक्षेत्र अधिकारी तुषार काळभोर यांनी दिली आहे.

काशीद येथून सर्वे हे अगदी जवळ असल्याने निश्चितच पर्यटक फणसाड पहाण्यासाठी गर्दी करतील, असा विश्वाससुद्धा या वेळी त्यांनी व्यक्त केला आहे. फणसाड अभयारण्य हे जैव विविधतेमध्ये १७ प्रजातींचे साप, १२ उभयचर प्राणी, १६ सस्तन प्राणी, २५ प्रजातींचे कोळी, १४ सागरी जीव आणि तब्बल १३२ प्रजातींची फुलपाखरे, १९ प्रकारचे प्राणी या अभयारण्यात आढळून येतात. ५४ चौरस किलोमीटर क्षेत्रात अभयारण्य विस्तारित असल्याने पर्यटकांना हे अभयारण्य सहज फिरता यावे, यासाठी नवीन जिप्सी गाडी मिळावी, त्यासाठी एक विशेष प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयात पाठवण्यात आल्याची माहिती या वेळी काळभोर यांनी दिली आहे.

जिप्सी वाहन मिळाल्यास पर्यटकांना अभयारण्य पहाणे सोपे जाणार असून यामधून फणसाडला उत्पन्नाचे स्तोत्रसुद्धा वृद्धिंगत होणार आहे. आमचे जिप्सी वाहन मिळवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती वन परिक्षेत्र अधिकारी तुषार काळभोर यांनी या वेळी दिली आहे.

# संकष्ट चतुर्थीनिमित्त अष्टविनायक क्षेत्र महड येथे भाविकांची गर्दी

**खोपोली : प्रतिनिधी**



रविवारी सुट्टीच्या दिवशी आलेल्या संकष्ट चतुर्थीनिमित्ताने खालापुर तालुक्यातील महड अष्टविनायक क्षेत्र येथे वरद विनायकाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. सकाळपासूनच लागलेल्या भाविकांची रांग उशीरापर्यंत कायम होती.

महापूजा झाल्यावर पहाटे पाच वाजता अष्टविनायक क्षेत्र वरदविनायकाचे दर्शन भाविकांसाठी सुरू झाले. दर्शनासाठी आलेल्या भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून श्री. क्षेत्र महड देवस्थान व्यवस्थापन कमिटीच्या कार्यवाह मोहिनी वैद्य व यांच्या मार्गदर्शनाखाली देवस्थान व्यवस्थापन कमिटीचे राजेंद्र बडगुजर यांनी व स्थानिक सेवकांनी आपआपल्या स्तरावर सोयी सुविधा उपलब्ध केल्याचे दिसले.


## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
## ता. पनवेल, जि. रायगड

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**मे २०२४**

| अ. क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | विक्रम नारायण पाटील / निता विक्रम पाटील | मिनाक्षी भानुदास लगारे / भानुदास सर्जेराव लगारे | पवल२-५७६१-२०२४ | १९/०३/२०२४ | सदनिका क्र.३०१, तिसरा मजला, प्रथमेश रेसिडेन्सी को.ही.सो. मौजे पालीदेवद |
| २ | हर्षदा शांताराम चवरकर | रेश्मा शांताराम चवरकर/ स्वप्नील शांताराम चवरकर | पवल२-७८४२-२०२४ | १८/०४/२०२४ | सदनिका क्र.००२, तळ मजला, पुष्पकलश २. को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ३ | योगेश बबन आंग्रे / अंकुश बबन आंग्रे / नयना अंकुश आंग्रे | श्रीराम बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स | पवल २- १४०९४-२०२२ | १०/१०/२०२२ | सदनिका क्र. ४०९, चौथा मजला, ए विंग, श्रीराम दर्शन मौजे शिलोत्तर रायचूर |
| ४ | प्रशांत मुकुंद साळुंके | मरीअम्मा जोसेफ ऊर्फ मरीअम्मा अल्फोन्स | पवल२-३४४९-२०२४ | १६/०२/२०२४ | सदनिका क्र. १०३, पहिला मजला, ए विंग, साईगंगा को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ५ | रुपाली स्वप्निल शिर्के / स्वप्निल सुरेश शिर्के | रजनी दत्तात्रय शिवले / दत्तात्रय जालिंदर शिवले | पवल२-८७१७-२०२४ | २९/०४/२०२४ | सदनिका क्र.३०५, तिसरा मजला, बी विंग, बि.नं. ४, साई इन्क्लेव्ह को.हौ. सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ६ | हेमंत शांताराम पाटील | धनराज सतीश कोटियन | पवल२-२२६६३ - २०२३ | २२/१२/२०२३ | सदनिका क्र.१०२, पहिला मजला, ए विंग, साईकृपा को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ७ | सुरेश श्रीनिवास शेट्टी / सुहासिनी सुरेश शेट्टी | तरूण नायेक / अल्पना नायेक | पवल३-६१९७-२०२३ | ५/४/२०२३ | सदनिका क्र. २०४, दुसरा मजला, बी विंग, ब्ल्यू हेवन को.हौ.सो. मौजे पालीदेवद. |
| ८ | प्रशांत विष्णू पाटील | कै. भगवान गजानन पाटील मयत तर्फे कायदेशीर वारस उषा भगवान पाटील | पवल२-३१७९-२०२३ | २४/०२/२०२३ | शॉप नं. ०१, तळ मजला, श्रीराम दर्शन को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर, |
| ९ | ज्योती नितीन मोरे / नितीन बबन मोरे | विनायक विठ्ठल गोंधळी | पवल२-७४९९-२०२४ | १२/२/२०२४ | सदनिका क्र.१०३, पहिला मजला, सी विंग, बि.नं.१, साक्षी पार्क २ को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १० | गजेंद्र मधुकर सवालाखे | शकुंतला मधुकर सवालाखे | पवल२-९२८३-२०२४ | ६/५/२०२४ | सदनिका क्र. ४०१, चौथा मजला, ई विंग, श्री वसंतविहार को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ११ | चंद्रकांत पोसू पाटील | चंद्रकांत पोसू पाटील / विमल चंद्रकांत पाटील | पवल३-०२३५३-२००७ | २/३/२००७ | सदनिका क्र.०७, पहिला मजला, बि.नं.जी.३, वसुंधरा को. हो.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १२ | प्रियंका अक्षय भगत | दत्तात्रेय दिनकर भगत | मद्रांक विक्री नोंदवही अनुक्रमांक ५६४६ | ७/५/२०२४ | घर मिळकत क्र. ३९६/ शॉप २ व ३, मौजे पालीदेवद |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(एन. जी. केणी)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल. जि. रायगड**

# फ्लेमिंगो पाणथळीतील जलप्रवाह सुरू

## आमदार गणेश नाईक यांच्या पाठपुराव्याला यश

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार गणेश नाईक यांच्या पाठपुराव्यामुळे फ्लेमिंगो पाणथळीतील पाणीप्रवाह सुरू करण्यात आला आहे.

नवी मुंबईतील नेरूळ येथील ३० एकरांचा डीपीएस फ्लेमिंगो तलाव हा फ्लेमिंगो पक्ष्यांचे निवासस्थान म्हणून परिचित आहे. या तलावावर सध्या विकासकामांची नजर असून, हा तलाव हदोण्याची तयारी सुरू आहे. त्यास सिडकोचेदेखील पाठबळ लाभलेले आहे. एकीकडे पालिकेकडून हा तलाव फ्लेमिंगो पक्ष्यांचे स्थळ म्हणून त्याबाबत उपाययोजना केल्या जात असतानाच, या तलावात येणारा पाणी प्रवाह रोखण्याचे कुटील कारस्थान अज्ञातांकडून सुरू असल्याचे दिसून येत आहे. याबाबत पर्यावरणवादी आक्रमक झालेले असतानाच, आता थेट आमदार गणेश नाईक यांनीदेखील या भागाचा दौरा करत, सिडको व पालिकेला हा प्रवाह सुरू करून प्रवाह अडवणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. अखेर




तातडीने शासनाने या भागातील प्रवाह सुरू केल्याने पाणी प्रवाह सुरू झाला आहे. त्यामुळे पक्षी प्रेमींनी समाधान व्यक्त केले आहे.

आमदार नाईक यांनी गुरुवारी सिडकोचे मुख्य अभियंता एनसी बायस आणि नागरी अधिकाऱ्यांना मी स्वतः जेसीबी घेऊन हा प्रवाह सुरू करून, असा इशारा दिला होता. त्यांनी निदर्शनास आणून दिले की आता वापरात नसलेल्या प्रवासी वाहतूक टर्मिनलकडे जाण्यासाठी रस्त्याच्या बांधकामामुळे तलावाकडे जाणारी मुख्य जलवाहिनी गाडली गेली आहे आणि तलाव पूर्णपणे कोरडा झाला आहे आणि ही बाब फ्लेमिंगो संवर्धनासाठी अनुकूल नाही.

पर्यावरणवाद्यांनी या वेळी आठ सिमेंट पाईप्सदेखील अधिकाऱ्यांना दाखवून दिले होते. ज्यातून रस्ता बांधण्यापूर्वी सुमारे पाच वर्षांपूर्वीपर्यंत खाडीतून पाणी पुढे-पुढे जात होते. या ३० एकर भूखंडाचे व्यापारीकरण करण्याचा गुप्त हेतू दिसून येत असल्याचा आरोप नाईक यांनी केला होता. पाणी बंद झाल्याने या ठिकाणी फ्लेमिंगो पक्षी येणे बंद होईल तसेच, फ्लेमिंगो सिटी ही ओळख देखील नष्ट होण्याचा धोका वाढला होता. नॅटकनेक्ट फाऊंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी निदर्शनास आणून दिले की, सिडकोने आपल्या विकास आराखड्यात, भावी विकासासाठी तलाव आधीच चिन्हांकित केला आहे. नगररचनाकार सिडको जैवविविधतेला मूठमाती देत निसर्गाशी खेळत आहे हे खरोखरच दुर्दैवी आहे, असे कुमार यांनी म्हंटले होते.

नॅटकनेक्ट फाउंडेशनच्या तक्रारीवरूनकेंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने राज्याच्या पर्यावरण विभागाला सरोवराची तोडफोड केल्याच्या आरोपांची चौकशी करून अहवाल देण्यास सांगितले आहे.

दरम्यान, हायकोर्टाने नेमलेल्या खारफुटी संरक्षण आणि संवर्धन समितीने कुमार यांना जागेच्या पाहणीसाठी बोलावले आहे. नवी मुंबई एन्व्हायर्नमेंट प्रिझर्वेशन सोसायटीमधील वीरेंद्रकुमार गांधी आणि संदिप सरीन यांनी नाईक यांना कळवले की मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालात हा तलाव संरक्षित असल्याचे दाखवण्यात आले आहे. एनएमईपीएसच्या याचिकेवर न्यायालयाने साडेपाच वर्षांपूर्वी सिडकोला तलावातील पाण्याचा प्रवाह थांबणार नाही याची काळजी घेण्याचे निर्देश दिले होते.

जेट्टीच्या कामाच्या पर्यावरणीय मंजुरीमध्ये पाण्याचा प्रवाह आणि वनस्पती आणि प्राणी यांना त्रास होऊ नये, अशी स्पष्ट अटही घालण्यात आली होती. तरीही ही अट झुगारण्यात आली, असे कुमार यांनी सांगितले. माजी नगरसेविका व पर्यावरण प्रेमी नेत्रा शिर्के म्हणाल्या की, सिडकोने निसर्गाचा आदर करून नागरी व रिअल इस्टेट विकासाबाबत समतोल दृष्टीकोन अवलंबला पाहिजे.

# वनविभागाची पडीक जमीन देण्याच्या बहाण्याने फसवणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

वनविभागाची पडीक ५०० एकर जमीन नावावर करून देतो सांगून फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. स्वतःला सीबीआयचा कर्मचारी सांगणाऱ्या व्यक्तीने कोल्हापूरच्या ठेकेदारासह त्याच्या मित्राची ८० लाखांची फसवणूक केली आहे. या प्रकरणी सीबीडी पोलीस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.




कोल्हापूर येथे राहणाऱ्या प्रसाद घोरपडे यांच्यासोबत हा प्रकार घडला आहे. त्यांचा कळंबोली येथे कार्गो ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असून त्यातून कोरेगावच्या सुनील धुमाळ याच्यासोबत ओळख झाली होती. या वेळी लाल दिव्याच्या गाडीतून फिरणाऱ्या धुमाळ याने तो सीबीआयमध्ये कॉन्स्टेबल चालक असल्याचे सांगितले होते तसेच लाल दिव्याची गाडी घेऊनच तो अनेकदा त्यांच्या भेटीला येत असे. यादरम्यान त्याने ७० ते ८० लाखांत वनविभागाची जमीन नावावर करून मिळेल असे घोरपडेंना सांगितले होते. त्याच्यावर विश्वास ठेवून घोरपडे यांनी त्यांचा मित्र प्रसाद जैन याच्या मदतीने दोघे मिळून आजरा येथील ५०० एकर वनजमीन नावावर करून घेण्याची तयारी दाखवली होती.

यासंदर्भात त्यांची सीबीडी येथील शासकीय निवासस्थानात बैठक देखील झाली असता त्याठिकाणी त्याला रोख व ऑनलाईन असे टप्प्याटप्प्याने ८० लाख रुपये देण्यात आले. यानंतर धुमाळ याने त्यांना भारत सरकारची जमीन हस्तांतरणाचे ना हरकत पत्र व सिटी सिव्हिल दिंडोशी कोर्टाचे आदेशाचे पत्रही दिले होते, परंतु जमीन हस्तांतरणाची अंतिम आदेश देण्यात उशीर होऊ लागल्याने त्यांनी अधिक चौकशी केली. त्यामध्ये कोर्ट आदेश, भारत सरकाचे पत्र बनावट असल्याचे समोर आले.

त्यानंतरही तो घेतलेले पैसे परत करण्यास टाळाटाळ करू लागल्याने त्यांनी सीबीआय कार्यालयात चौकशी केली असता त्याचे वापरलेले ओळखपत्र बनावट असल्याचे समोर आले. यावरून तो सीबीआय कर्मचारी नसतानाही लाल दिव्याची गाडी वापरून तो शासकीय कर्मचारी असल्याचा बनाव करून फसवणूक केल्याचे समोर आले. याप्रकरणी त्याच्याविरोधात सीबीडी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

दरम्यान, फसवणुकीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याने पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

# पनवेल येथे जेके टायर नवीन ट्रक व्हील सेंटरचे उद्‌घाटन

**पनवेल : वार्ताहर**

भारतीय टायर उद्योगातील प्रमुख आणि टायर बाजारपेठेतील आघाडीची कंपनी असलेल्या जेके टायर ॲण्ड इंडस्ट्रीज लिमिटेडने महाराष्ट्रात त्यांच्या व्यावसायिक वाहनांसाठी १२व्या ब्रँड शॉपचे उद्‌घाटन करत राज्यातील त्यांचा विस्तार आणखी वाढवला आहे. या शॉपचे व्यवस्थापन एआरएम लॉजिस्टिक सोल्युशन्स प्रा. लिमिटेड यांच्याकडे असणार आहे. या सेंटरचे उद्‌घाटन पनवेल तालुक्यातील कोन गाव येथे जेके टायर अँड इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष (भारत) अनुज कथुरिया यांच्या हस्ते



करण्यात आले.

साडेचार हजार चौरस फुटांवर पसरलेले आणि राज्य महामार्ग ४८ वर स्थित हे अत्याधुनिक वन-स्टॉप शॉपचालकांच्या अडचणी दूर करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. अत्याधुनिक सुविधेमध्ये व्यावसायिक वाहनांसाठी मानक आणि स्मार्ट टायर्सची विस्तृत श्रेणी, प्रगत व्हील सर्व्हिसिंग उपकरणे, उच्च क्षमता असलेले तांत्रिक सल्लागार आणि जेके टायरच्या स्टोअर्सची अद्वितीय वैशिष्ट्ये दर्शविणारे अनुभव क्षेत्र आहे.

# केंद्र सरकारच्या नोकऱ्यांबाबत मोफत मार्गदर्शन

## आगरी कोळी युथ फाउंडेशनचा उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

आगरी कोळी युथ फाऊंडेशन आणि स्टडी सेंटर घणसोली यांच्या संयुक्त विद्यमाने स्टाफ सिलेक्शन कमिशनच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या नोकऱ्या संदर्भातील स्पर्धा परीक्षांसाठीचे मोफत मार्गदर्शन शिबिर वाशी रेल्वे स्टेशन जवळील भारतीय विद्याभवन येथे झाले.

केंद्र सरकारमध्ये ग्रुप बी आणि ग्रुप सीमध्ये हजारो नोकऱ्यांची संधी दरवर्षी निघत असते, मात्र नवी मुंबईतील स्थानिक आगरी कोळी कराडी किंवा एकंदरीतच मराठी भाषिक मुले मुली ह्या नोकऱ्यांच्या संधीचा लाभ घेताना दिसत नाहीत. त्यामुळे मराठी मुलामुलींमध्ये तसेच स्थानिक आगरी कोळी कराडी मुला मुलींमध्ये नोकऱ्यांबाबत आणि त्या अनुषंगाने असलेल्या स्टाफ सिलेक्शन कमिशनच्या स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्याचा तसेच या



बाबतीत ट्रेनिंग व्यवस्था निर्मितीचा विडा आगरी कोळी युथ फाऊंडेशन आणि घणसोली स्थित स्टडी सेंटर ह्या भूमिपुत्र प्रणित क्लासेसच्या संयुक्त विद्यमाने उचलण्यात आलेला आहे. त्याच पार्श्वभूमीवर ७ मे २०२४ पूर्वी केंद्र सरकारच्या बारावी पास पात्रतेसाठी असलेल्या क्लरिकल नोकरीच्या स्पर्धा परीक्षांचे अर्ज जवळपास ५० एक मुलामुलींकडून भरवण्यात आगरी कोळी युथ फाऊंडेशन आणि स्टडी सेंटरला यश आले होते, आणि आता फॉर्म भरलेल्या मुलामुलींसाठी ट्रेनिंगचे नियोजन आवश्यक होते. या अनुषंगाने मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते.

मार्गदर्शन शिबिराला माजी आयआरएस अधिकारी आणि सेंट्रल एक्साइजचे माजी सहाय्यक आयुक्त सुहास पाटील यांनी बारावी पास पात्रतेचे स्पर्धा परीक्षेच्या तयारीचे अनेक कानमंत्र देऊन विद्यार्थ्यांना प्रेरित केले तसेच केंद्र सरकारच्या नोकऱ्यांचे वैशिष्ट्य आणि त्याच्या स्पर्धा परीक्षा क्रॅक करण्याच्या वेगवेगळ्या टेकनिक यावरसुद्धा उत्तम असे मार्गदर्शन केले. ५० पैकी जवळपास ३० मुलामुलींनी ह्या पहिल्या पर्वाच्या मार्गदर्शन शिबिराचा लाभ घेतला, आता पुढच्या टप्प्यात दोन दिवसीय फुल डे वर्क शॉप चे नियोजन असून जे बारावी पास पात्रतेची परीक्षा आता देणार आहेत किंवा भविष्यात देणार आहेत.

सर्वांनी येणाऱ्या दोन दिवसीय निःशुल्क वर्क शॉपची नोंदणी करून लाभ घ्यावा, असे आवाहन आगरी कोळी युथ फाऊंडेशन आणि स्टडी सेंटर च्या वतीने करण्यात येत आहे. उपस्थित विद्यार्थ्यांचे, मान्यवरांचे आणि वक्त्यांचे आभार व्यक्त करून शिबिराची सांगता झाली.

# उरण येथे बुद्धपौर्णिमा साजरी



**उरण : वार्ताहर**

बौद्धजन पंचायत समिती उरण शाखा क्रमांक ८४३ व माता रमाई महिला मंडळ बौद्धवाडी यांच्या वतीने नुकतेच बुद्ध विहार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे पौर्णिमा साजरी करण्यात आली.

या वेळी बौद्धजन पंचायत समिती अध्यक्ष प्रकाश कांबळे, उपाध्यक्ष हरेश जाधव, चिटणीस विजय पवार, खजिनदार अनंत जाधव व कार्यकारी सर्व सदस्य तसेच माता रमाई महिला मंडळ कमिटी अध्यक्ष सुनीता सपकाळे, उपध्यक्ष संगीता जाधव, सचिव करूणा भिंगावडे, खजिनदार सविता साळवी व सर्व सदस्य आदी उपस्थित होते. सर्वांनी गौतमबुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.

# सीबीडीमध्ये दुषित पाण्याचा पुरवठा कायम; कारवाईची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सीबीडी येथील आयकर कॉलनी येथे सातत्याने होत असलेल्या दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. नागरिकांना दुषित स्वरूपातील पाणी मिळत असल्याने पोटदुखी जुलाब तसेच अन्य साथीचे आजाराची लागण झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

आयकर कॉलनी येथील शेकडोंच्या संख्येने असलेल्या स्थानिक नागरिकांना मागील काही दिवसांपासून पिण्याचे पाणी दुषित स्वरूपातील येत आहे. याबाबत नवी मुंबई महापालिका पाणीपुरवठा विभागातील संबंधित अधिकारी यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत. पाणीपुरवठा विभागाकडून दुषित पाण्याचे नमुनेदेखील घेण्यात आले आहेत, मात्र अद्यापही पुढील काहीही कारवाई झाली नसून दूषित पाण्याचा सामना नागरिकांना आजही करावा लागत आहे. याबाबत त्वरित कारवाई करावी, अशी मागणी भाजप कार्यकर्ते पंजाबराव हारणे यांनी नागरिकांच्या वतीने केली आहे.

# ज्वेल ऑफ नवी मुंबईतील दुर्गंधी दूर

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ विभागातील सांडपाणी अनेक वर्षे नाल्याचे पाणी ज्वेल्सच्या होल्डिंग पाँडमध्ये मिसळत होते. त्यामुळे या परिसरात दुर्गंधी निर्माण होत होती. ती सोडविण्यासाठी महापालिकेने मलउदंचन केंद्र उभारले आहे. त्यामुळे दुर्गंधी दूर झाली आहे.

या परिसरातील सांडपाणी सेक्टर ५० मधील मलनिस्सारण केंद्रात सोडण्यास सुरुवात झाली असून त्यामुळे पर्यटनस्थळ असलेला ज्वेल्स परिसर प्रदूषणमुक्त झाला आहे. नवी मुंबई महापालिकेने पामबीच रोडला लागून नेरूळ येथे भूखंडावर ज्वेल्स ऑफ नवी मुंबई विकसित केले आहे. ठिकाणी रोज ५ हजारापेक्षा जास्त नागरिक सकाळी व सायंकाळी फिरण्यासाठी व व्यायामासाठी येत असतात. हा परिसर पर्यटनस्थळ म्हणून विकसित झाला आहे, परंतु नेरूळ विभागातील सांडपाणी मुख्य वाहिनीमधून मलनिस्सारण केंद्रामध्ये घेऊन जाण्यास अडथळा निर्माण होत असल्यामुळे ते होल्डिंग पाँडमध्ये मिसळत असल्याने आहोटीच्या वेळी त्यामधून प्रचंड दुर्गंधी निर्माण होत होती.

होल्डिंग पाँडमध्ये सांडपाणी जाऊ नये यासाठी महानगरपालिकेने २ एमएलडी क्षमतेचे मलउदंचन केंद्र उभारून त्याद्वारे सांडपाणी खेचून ते सेक्टर ५० मधील अत्याधुनिक मलनिस्सारण केंद्राकडे वळविले आहे. त्यामुळे आता नेरूळ विभागातील सांडपाणी होल्डिंग पाँडमध्ये जावून होणारे प्रदूषण थांबले आहे. यामुळे निर्माण होणारी दुर्गंधीही थांबली असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# लोणच्यासाठी लागणाऱ्या कैऱ्यांना मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शहरी असो की ग्रामीण भाग पावसाळा सुरू होण्याआधी गृहिणींची लोणचे तयार करण्याची लगबग सुरू होते. सध्या बाजारात लोणच्यासाठी आवश्यक कैऱ्या, मसाला तसेच लोणचे साठविण्यासाठी लागणाऱ्या बरण्या दाखल होत असून, बाजार लोणच्यासाठी लागणाऱ्या खास कच्च्या कैऱ्यांनी फुलला आहे.

बाजारात सध्या लोणच्यासाठी विविध जातीच्या कैऱ्या विक्रीसाठी आल्या आहेत. ताटाची शोभा वाढविणारे तसेच आबालवृद्धांना आवडणारे लोणचे तयार करण्यासाठी महिला वर्गाची सध्या सर्वत्र लगबग सुरू आहे. अलीकडच्या रेडिमेडच्या युगात बंद पाकिटांसह बरण्यांतून तयार लोणचे मिळत असले, तरी वर्षभर लागणारे लोणचे घरगुती स्तरावर तयार करण्यालाच गृहिणींचे प्राधान्य असते. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून अनेक महिला घरगुती



लोणचे तयार करण्यासाठी धावपळ करतात. प्रत्येक राज्यानुसार लोणची बनविण्यासाठी महिलांची स्पर्धाच सुरू होते. कोणी महाराष्ट्रीयन पद्धतीचे, कुणी मद्रासी, गुजराती, पंजाबी तर कुणी उत्तर भारतीय पद्धतीचे लोणचे बनविण्यास गुंग झाल्या आहेत. प्रत्येक महिला ही आपल्या चवीनुसार आणि आवडीनुसार लोणचे भरते.

विक्रेते राजापुरी, गुजराती, सरदार, गावरान आदी प्रकारच्या कैऱ्या विक्रीस आणत आहेत. यातही गावरान कैऱ्यांनाच अधिक प्राधान्य आहे. ३० ते ४० रुपये किलो दराने कैऱ्या बाजारात विकल्या जात आहेत. काही ठिकाणी तर स्पेशल लोणच्या साठी हातगाडी भरून कैऱ्या विकण्यासाठी विक्रेते आणत आहेत.

बाजारात विविध प्रकारचे लोणचे मिळत असले, तरी गृहिणींचा घरी लोणचं तयार करण्याकडे कल असतो. हे लोणचे वर्षभर टिकते व ते जसे जसे मुरते तशी त्याची चव वाढत जाते असा अनेक महिलांचा विश्वास आहे. त्यामुळे पावसाळ्याच्या सुरुवातीलाच लोणचं तयार करण्यासाठी महिलांची लगबग दिसून येते. कैरीपासून घरगुती तिखट, गोड लोणच्या बरोबर गूळ आंबा ही तयार केला जात असल्याचे गौरी धेंडे या गृहिणीने सांगितले.

**एपीएमसी बाजारात उन्हाळा सुरू होताच कच्च्या कैऱ्या बाजारात दाखल होतात. त्यात निलम, तोतापुरी जातीच्या कैरीचा समावेश आहे. महाराष्ट्रसह दक्षिण भारत, गुजरात मधून याची आवक होत असते. बाजारात दाखल होणाऱ्या कैऱ्या चवीला आंबट असून लोणचे आणि पन्हे बनविण्यासाठी अधिक मागणी होत असून आणखी पंधरा दिवस बाजारात कैरी उपलब्ध असतात.**
**-विजय बेंडे, व्यापारी**

# आवक कमी झाल्याने लसूण महागला



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

एपीएमसीतील घाऊक बाजारात लसूण १५० ते १६० रुपये किलो दराने विकला जात आहे. त्यामुळे दोन महिन्यांपासून किरकोळ बाजारात लसणाचे दर २०० पार आहेत. सध्या आगोटीचे कामे करण्याची लगबग सुरू असून वर्षभराचा मसाला करण्यासाठी लसणाचा वापर करतात, मात्र दर वाढल्याने गृहिणींचे बजेट कोलमडले आहे.

घाऊक बाजारात लसणाचे दर ५० ते ७० किंवा जास्तीत जास्त १०० रुपये किलोपर्यंत असतात, मात्र आठ महिन्यांपासून लसणाच्या दर चढे असून किरकोळ बाजारात लसणाचे दर २०० रुपये किलो आहेत. मध्यंतरी आवक कमी झाल्याने लसणाचे दर घाऊक बाजारात ३०० ते ३५० रु किलो झाले होते.

त्यामुळे किरकोळ बाजारात लसूण ४०० पार गेला होता. त्यानंतर आवक वाढल्याने दर कमी होण्यास सुरुवात झाली. त्यामुळे लसणाचे दर पूर्ववत होतील, अशी ग्राहकांना अपेक्षा होती. मात्र घाऊक बाजारात १५० वर स्थिरावलेले दर अद्याप कायम आहेत. त्यामुळे किरकोळ बाजारात लसणाचे दर महिनाभरापासून २०० रुपये किलोच्या वर आहेत. पावसाळ्यात त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यापाऱ्यांकडून वर्तवली जात आहे.

गतवर्षी लसणाचे उत्पादन ५० टक्केच झाले होते. सध्या घाऊक बाजारात लसूणच्या ५ ते ६ गाड्या येत आहेत. मागणी आणि पुरवठा यांचा ताळमेळ बसत नसल्याने दर वाढले आहेत. त्यामुळे ग्राहकांना लसणासाठी दुप्पट पैसे मोजावे लागत आहेत. आणखी दोन महिने हीच परिस्थिती कायम राहणार असल्याचा अंदाज व्यापाऱ्यांनी वर्तवला आहे.

# पेण येथील मृतदेहाचे गूढ उकलले

## हत्या केल्याचे निष्पन्न; सहा आरोपी जेरबंद

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पेण पोलीस ठाणे हद्दीत २२ मे रोजी ४ वाजता अंबिवली फाटा येथे मुंबई-गोवा महामार्गालगत खड्ड्यात एका अनोळखी व्यक्तीचा गोणपाटात बांधलेला व दुर्गंधी सुटलेला मृतदेह आढळून आलेला होता. या व्यक्तीचा खून झाल्याचे समोर आले असून या प्रकरणी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रायगड आणि पेण पोलिसांनी तीन दिवसांमध्ये सहा आरोपींना जेरबंद केले आहे.



या गुन्ह्यात प्रथम मयताची ओळख पटविणे व आरोपीचा शोध घेणे हे आव्हान पोलिसांसमोर होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, संदीप पोमण, उपनिरीक्षक धनाजी साठे, विकास चव्हाण व १६ अंमलदार यांची चार पथक तयार करून तपास सुरू केला. तांत्रिक तपासामध्ये आरोपी अनुज भालचंद्र मोरे (रा. आजादनगर, माटुंगा, मुंबई) याचा सहभाग निष्पन्न झाला. त्यास ताब्यात घेण्यात आले. त्याने गुन्हा कबुल केला व साथीदारांची नावे सांगितली. त्यानुसार दुसऱ्या पथकाने मनोज विष्णू गांगुर्डे, गणेश नारायण देशमुख, कानिफनाथ सुरेश म्हात्रे व सुमीत केशव चैरे यांना पनवेल परिसरातून ताब्यात घेतले. एक महिलाला रसायनी परिसरातून ताब्यात घेतले.

या गुन्ह्यातील मयत अभिषेक (पूर्ण नाव व पत्ता माहीत नाही) हा हॉटेल पंजाबी पॅलेट पनवेल येथे काही दिवस कामाला होता. या ठिकाणी महिला सफाईचे काम करीत होती. अभिषेक या महिलेस त्रास देत होता तसेच तिचे मोबाईलमध्ये व्हिडीओ बनवत होता. त्यानंतर तो काम सोडून निघून गेला. केलेल्या कामाचा पगार घेण्यासाठी अभिषेक १७ मे २०२४ रोजी हॉटेलवर आला होता. त्या वेळी त्याने महिला कर्मचाऱ्याचा मोबाईल चोरी करून घेऊन गेलेला होता. गुन्ह्यातील ताब्यात घेतलेले आरोपी या हॉटेलमध्ये काम करणारे मॅनेजर, वेटर व स्वयंपाकी आहेत.

महिला आरोपी अभिषेकने तिच्याबरोबर केलेले वर्तन व चोरलेल्या मोबाईलबाबत माहिती दिली. त्यावरून मॅनेजर मनोज गांगुर्डे याने मयतास संपर्क साधून १९ मे २०२४ रोजी १०.४५ वाजता बोलावून घेतले. तो आला असता त्यांनी त्याला हॉटेलमध्ये बसवून महिलेस त्रास का दिला व तिचा मोबाईल का चोरी केला याबाबत विचारणा करून सर्व आरोपींनी संगनमत करून लाथाबुक्क्यांनी मारले. त्यातच अभिषेकचा झाला. त्यानंतर आरोपींनी मयतास हॉटेलच्या फ्रीजमध्ये कोंबून बसविले व एक भाड्याचा टेम्पो बोलावून मयत बसविलेला फ्रीज टेम्पोमध्ये घालून ग्रीन पार्क धाब्यावर आणून ठेवला.

रात्र झाल्यानंतर मयतास गोणी बांधण्यासाठी पनवेल येथून आरोपी अनुज चंद्रशेखर मोरे व पाहिजे असलेला आरोपी राज (पूर्ण नाव माहीत नाही) यांनी बीग साडी बाजार पनवेल या ठिकाणावरून गोणी खरेदी केली व त्यानंतर फ्रीजमधून मयतास बाहेर काढून त्या गोणीत भरून मृतदेह स्कुटीवरून नेऊन पेणमध्ये रस्त्याच्या कडेला फेकून दिला व सर्व आरोपी पसार झाले. या आरोपींना अटक करण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखचे निरीक्षक बाळासाहेब खाडे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक निरीक्षक भास्कर जाधव, संदीप पोमण, उपनिरीक्षक धनाजी साठे, विकास चव्हाण, सहाय्यक फौजदार दीपक मोरे, प्रसाद पाटील, हवालदार संदीप पाटील, सुधीर मोरे, अमोल हंबीर, प्रतिक सावंत, जितेंद्र चव्हाण, राकेश म्हात्रे, रूपेश निगडे, शिपाई ईश्वर लांबोटे, स्वामी गावंड, अक्षय जगताप, अक्षय सावंत, बाबासो पिंगळे, लालोसो वाघमोडे, ओंकार सोंडकर, भरत तांदळे यांनी ही कामगिरी केली.

पोलिसांच्या संयुक्त पथकांनी गेले तीन दिवस विश्रांती न घेता अहोरात्र तपास केला व आपापले तपासाचे कौशल्य पणाला लावून त्या नुसार गुप्त बातमीदार तसेच तांत्रिक साधनांचा वापर करून गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेतला. त्यानंतर वेगवेगळ्या पथकांनी त्यांच्या मुसक्या आवळल्या. या गुन्ह्याचा अधिक तपास पेण पोलीस ठाणे करीत आहे.

# पोलादपूर शहरात खासदार तटकरेंच्या मताधिक्यात वाढ?

### पीएम मोदींसह ना. आदिती, आ. गोगावले, कळंबे फॅक्टरचा प्रभाव

**पोलादपूर : शैलेश पालकर**

रायगड लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांना पोलादपूर शहरातील मतदारांनी यंदाच्या निवडणुकीतदेखील भरघोस मतदान केले. त्यामुळे त्यांच्या मताधिक्यामध्ये वाढ होण्याची चिन्हे दिसून येत आहेत.



गेल्या लोकसभा निवडणुकीत युपीएचे उमेदवार सुनील तटकरे यांच्या पोलादपूर शहरातील प्रचारात माजी आमदार स्व.माणिक जगताप सक्रिय होते, मात्र यंदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये फूट पडून राष्ट्रवादीचा महायुतीमध्ये समावेश झाला आणि काँग्रेस व शेकाप महाविकास आघाडीमध्ये सहभागी झाल्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर परिणाम होऊन मतदानाचा कल विपरित होण्याऐवजी खासदार तटकरे यांना अनुकूल झाल्याचे पोलादपूर शहरातील वातावरण ध्वनित करीत आहे.

नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी सक्रिय असलेल्या भाजपासोबतच महायुतीची उमेदवारी खासदार तटकरे यांना जाहीर झाली. तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून पालकमंत्री म्हणून आदिती तटकरे यांचा तेव्हापासून वाढलेला जनसंपर्क, आमदार गोगावले यांच्या विकासकामांचा धडाका आणि मागील लोकसभा निवडणुकीवेळी शिवसेनेमध्ये असूनही तत्कालीन केंद्रीय मंत्री अनंत गीते यांच्या प्रचारास नकार देऊनही कोणतीही कारवाई न झालेले रायगड जिल्हा परिषदेचे तत्कालीन उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांचे स्थानिक नेतृत्व खासदार तटकरे यांना अनुकूल असणे या बाबी प्रामुख्याने तटकरेंसाठी लाभदायक ठरल्या असल्याचे बोलले जात आहे.

मंत्री आदिती तटकरे यांनी २०१९च्या कोरोना लॉकडाऊन काळात मदतकार्यावेळी जनतेला पुरविलेली रसद आणि २०२१च्या नैसर्गिक आपत्ती काळात केलेली आपत्ती निवारणाची कामे यामुळे त्यांचा एक स्वतंत्र फॅक्टर तयार होऊन खासदार तटकरे यांना मतदान होऊन मताधिक्य मिळवून देण्यापर्यंत लाभ होताना दिसून आला. सलोख्याचे संबंध असलेल्या काँग्रेस व समविचारी पक्षांच्या कार्यकर्त्यांशी आपुलकी ना. आदिती यांनी या वेळी लीलया मतांमध्ये परावर्तित केली. आमदार गोगावले यांच्या कार्यकर्त्यांसोबत संवाद साधून मोठेपणा देताना मतदान घडवून आणण्यासाठी संयमी राजकीय मुत्सद्दीपणाही त्यांनी दाखविला.

भाजपच्या वरिष्ठ पातळीवरून खासदार तटकरे यांचा प्रचार करण्याचे आदेश सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी यांना प्राप्त झाल्याने नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी सर्वजण खासदार तटकरे यांच्या प्रचाराला लागल्याचे दिसून आले. शिवसेना प्रतोद आमदार भरत व युवा नेते विकास गोगावले यांनीदेखील त्यांच्या प्रचारासाठी कंबर कसलेली दिसून आले. या सर्वांचा एकंदर परिणाम म्हणजे महायुतीची उमेदवारी खासदार तटकरे यांना पोलादपूर तालुक्यासह शहरामध्ये मताधिक्य वाढविणारी ठरणार आहे.

देशात एकूण सात टप्प्यांमध्ये मतदान होत आहे. आतापर्यंत सहा टप्पे पूर्ण झाले असून पहिल्या पाच टप्प्यांमध्येच महाराष्ट्रातील मतदान पूर्ण झाले आहे. सर्व टप्प्यांची एकत्रित मतमोजणी ४ जूनला होणार आहे. तेव्हा निकाल सर्वांसमोर येईल.



**खालापूर : अष्टविनायकांपैकी एक असलेल्या महड येथील तलाव कोरडा पडला आहे. या तलावात श्री वरदविनायकाची मूर्ती सापडल्याची आख्यायिका सांगितली जाते.**

## पुलावरून पडून युवक जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावरील दस्तुरी येथे असलेल्या अमृतांजन ब्रिजवरून एक युवक पडून गंभीर जखमी झाला आहे.

युवकाचे नाव अद्याप समजले नाही. या युवकाचा तोल जाऊन तो थेट २० ते २५ फूट खाली कोसळून गंभीर जखमी झाला. त्याला ॲम्ब्युलन्सने कामशेत येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. हा अपघात खंडाळा पोलीस ठाणे हद्दीत घडला असून पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास लोणावळा पोलीस ठाणे अंतर्गत खंडाळा पोलीस करीत आहेत.

# कर्जतमध्ये आयुर्वेदिक चिकित्सा शिबिर

### ३१० रुग्णांची तपासणी

**कर्जत : प्रतिनिधी**

माजी आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान कर्जत, ज्योविस आयुर्वेदा हॉस्पिटल दादर व नारी सामाजिक संस्था दादर-मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने श्री छत्रपती शिवाजी मंडळ, पाटील आळी कर्जत यांच्या सहकार्याने मोफत आयुर्वेदिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ३१० रुग्णांनी लाभ घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




शिबिराचे उद्‌घाटन कर्जतचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांचे हस्ते झाले. या वेळी डॉ. राज सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, डॉ. मणिशंकर गुप्ता, प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, मनीषा सुर्वे, विजय सातपुते यांच्यासह श्री छत्रपती शिवाजी मंडळाचे अध्यक्ष गजानन गुरव, माजी अध्यक्ष अशोक शिंदे, दत्तात्रेय म्हसे, पंच्छी गुप्ता, दीपक जाधव, अजय सातपुते, हरिश्चंद्र राऊत आदी उपस्थित होते.

गजानन गुरव यांनी उपस्थितांचे स्वागत केले. अशोक शिंदे यांनी, आमचे मंडळ आता ७० वर्षांचे होईल. कर्जतच्या अनेक समस्या सोडविण्यासाठी अनेक वर्ष हे मंडळ कार्य करीत आहे. अनेक लोकोपयोगी उपक्रम मंडळाच्या वतीने सातत्याने राबविले जात आहे' असे स्पष्ट केले. सुरेंद्र गरड यांनी आपल्या मनोगतात, प्रतिष्ठान व ज्योविसने तालुक्यात अनेक शिबिरांचे आयोजन केले आहे. अगदी ग्रामीण भागात जाऊन रुग्णांना दिलासा देण्याचे काम होत आहे, असे सांगितले. डॉ. ज्योती सातपुते यांनी ज्योविस आयुर्वेदच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील सर्वांचे शारीरिक आजार पळवून लावण्याचा संकल्प आम्ही सर्वांनी मिळून केला आहे. आयुर्वेद औषध वापरून केले जाणारे उपचाराला मेडिकल सायन्समध्ये मोठे महत्त्व आहे, असे नमूद केले.

मुकेश सुर्वे यांनी विचार व्यक्त करताना सांगितले की, स्व. तुकाराम सुर्वे यांना कर्जतमध्ये एखादे सुसज्ज हॉस्पिटल उभारावे असे मनापासून वाटत होते. त्यांचा तो संकल्प पूर्ण झाला नाही. त्यामुळे आम्ही या माध्यमातून तालुक्यातील रुग्णांना मोफत उपचार व औषधे देत आहोत. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी, अनेक आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाते, मात्र या शिबिराचे वैशिष्ट्य वेगळेच आहे. कधी महिना उजाडतो आणि कधी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे याकडे रुग्णांचे लक्ष असते. म्हणूनच आतापर्यंत आयोजित केलेली शिबिरे यशस्वी झाली आहेत. हेच खरे त्यांचे यश आहे' असे म्हटले. या वेळी ३१० रुग्णांची तपासणी डॉ. राज सातपुते यांच्यासह डॉ. मणिशंकर गुप्ता, डॉ. कोमल सोळंके, डॉ. पूजा कुबल, डॉ. ध्रुव दमानिया, डॉ. विधी जयस्वाल, डॉ. अदिती ओझा, डॉ. सौरभ कुशवाह, डॉ. आकाश तिवारी, डॉ. ऋतुजा पोटे, डॉ. कोमल सोळंके, डॉ. दत्ता गिरम तसेच आरोग्य सेविका आयेशा वाडकर, प्रतीक्षा ठोंबरे, प्रविणा तिर्धनकर, प्रीती घाडी, तनिष सोलंकी यांनी करून त्यांच्यावर योग्य उपचार करून मोफत औषधे दिली.

# डॉ. बाबासाहेबांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडविण्यात रमाबाई यांचा सिंहाचा वाटा आहे. रमाई म्हणजे बाबासाहेबांची सावली. रमाईने आपले जीवन बाबासाहेबांच्या कार्याप्रती समर्पित केले नसते, तर बाबासाहेबांना शून्यातून जग निर्माण करता आले नसते. आज रमाईंची पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त त्यांच्याबद्दल जाणून घेऊया या लेखातून...



मुंबईतील भायखळा मार्केटमधील मासळी बाजार येथे ४ एप्रिल १९०६ रोजी रमाईचे भिवासोबत लग्न झाले. रमाईच्या जीवनाच्या अनेक हृदयदायक घटना सांगता येतील. एका प्रसंगी बाबासाहेबांच्या सत्कार समारंभात रमाईला नेसायला लुगडे नव्हते. तेव्हा रमाईने बाबासाहेबांचा फेटा लुगडे म्हणून घातला. गरिबीची केवढी मोठी शोकांतिका, पण रमाईच्या त्यागामुळे आज देशातील लाखो महिलांचे जीवनच बदलून गेले आहे. रमाबाई संसारात रमल्या आणि भीमराव पुस्तकांत. बाबासाहेब तहानभूक विसरून पुस्तक वाचनात दंग असत. एकदा जेवणाची वेळ झाली असता रमाबाईंनी त्यांच्यापुढे जेवणाचे ताट ठेवले. साहेबांचे जेवण आटोपले असेल म्हणून ताट उचलण्यासाठी त्या खोलीत जरा वेळानेच गेल्या तर ताट तसेच उघडे. न राहून रमाबाईंनी त्यातल्या एका पुस्तकाचे पान उघडले आणि म्हणाल्या, या पुस्तकात नवऱ्याने आपल्या बायकोशी कसे वागावे, कुटुंबाशी कसे वागावे हे लिहिले असेल तेवढेच मला वाचून दाखवा. बाबासाहेब म्हणतात, 'अगं वेडे, नवऱ्यानं संसार कसा करायचा हे काही पुस्तकात लिहिलेल नसतं.'

बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात रमाई संघर्षरत राहिल्या हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दु:ख, गरिबी यावर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दु:खाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्यात. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दु:खाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मरण पावणे यासारखे जगात दुसरे दु:ख नाही. रमाईची तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफडून मरण पावली. म्हणूनच रमाईच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात, 'रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दु:खाशय होता.'

कष्ट, त्याग, संघर्ष, मातृत्व, प्रेम हे सर्व गुण रमाईत असल्यामुळे बाबासाहेबांचे त्यांच्यावर निस्सीम प्रेम होते. रमाईच्या त्यागाविषयी बाबासाहेब 'बहिष्कृत भारत'मध्ये लिहितात, 'आपण परदेशी असताना रात्रंदिवस जिने प्रपंचाची काळजी वाहिली व जिला ती अजूनही करावी लागत आहे. मी स्वदेशी परत आल्यावर माझ्या विपन्नावस्थेत शेणाचे भारे स्वत:च्या डोक्यावर वाहण्यातही जिने मागेपुढे पाहिले नाही अशा अत्यंत ममताळू, सुशील व पूज्य स्त्रीच्या सहवासात दिवसाच्या चोवीस तासातून अर्धा तासही मला घालविता येत नाही.' बाबासाहेबांनी व्यक्त केलेली ही खंत मन हेलावून टाकते. १९४०मध्ये लिहिलेला 'थॉट्स ऑन पाकिस्तान' हा ग्रंथ बाबासाहेबांनी रमाईला अर्पण केला आहे. अर्पणपत्रिकेत ते लिहितात, 'हृदयाचा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, चारित्र्याचे शुद्धत्व आणि याशिवाय त्या काळी कोणी मित्र नसलेल्या दिवसात आमच्या वाट्यास आलेले दारिद्र्य आणि विवंचना मनोधैर्याने व तत्परतेने सहन करण्याची जिने तयारी दर्शाविली त्या रामूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा ग्रंथ मी तिला अर्पण केला आहे.'

बाबासाहेबांच्या जीवनात अत्यंत कठीण काळात रमाईने त्यांना खंबीरपणे साथ दिल्यामुळेच बाबासाहेबांना आपल्या कोट्यवधी अस्पृश्य बांधवांचे जीवन फुलविता आले. २७ मे १९३५ रोजी रमाईचे मुंबई येथे झाले. रमाई व तिच्या अपूर्व त्यागाला त्रिवार अभिवादन! **-श्रीराम बनसोड**



# सराव सामन्याला विराट मुकणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलचा यंदाचा हंगाम संपुष्टात आला आहे. आता पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेची चाहूल लागली आहे. भारतीय संघाच्या

**टी-२० वर्ल्डकप**

अंतिम १५मधील अनेक खेळाडू पुढील आठवड्यात वर्ल्डकपसाठी रवाना होणार आहेत, मात्र भारताचा तडाखेबाज फलंदाज विराट कोहली भारतीय संघाचा भाग असला तरी तो १ जून रोजी होणाऱ्या बांगलादेशविरोधातील सराव सामन्यात खेळू शकणार नाही. याचे कारण त्यानेच स्पष्ट केले आहे.



राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसन आणि मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याही नियोजित वेळेपेक्षा उशिराने रवाना होणार आहे. भारतीय संघातील खेळाडूंची पहिली तुकडी शनिवारी रवाना झाली, तर दुसरी तुकडी सोमवारी रवाना होणार आहे. संजूने दुबईत वैयक्तिक काम असल्याचे कारण देत बीसीसीआयकडून उशिरा युएसएला पोहचण्याची परवानगी घेतली आहे, तर विराट कोहलीला आयपीएलनंतर छोटीशी विश्रांती हवी आहे. त्यामुळे त्यानेही उशिरा पोहचण्याची विनंती केली.

विराट कोहलीने यंदाच्या आयपीएलमध्ये आपल्या फलंदाजीची कमाल दाखवत ऑरेंज कॅप आपल्या नावावर केली. पहिल्या क्वालिफायर सामन्यासह कोहलीने एकूण १५ सामने खेळले. या सामन्यात त्याने तब्बल ७४१ धावा केल्या, ज्यामध्ये एक शतक आणि पाच अर्धशतकांचा समावेश आहे. पहिल्या क्वालिफायर सामन्यात आरसीबीला राजस्थान रॉयल्सकडून पराभव पत्करावा लागल्यामुळे यंदाही आयपीएलच्या चषकावर नाव कोरण्याचे त्यांचे स्वप्न भंगले.

बीसीसीआयने विराट कोहली, सॅमसन आणि हार्दिक पांड्या या तीनही क्रिकेटपटूंची विनंती मान्य केली आहे. बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, विराट कोहलीने उशिरा सहभागी होण्याबाबत आधीच परवानगी मागितली होती. त्यामुळेच बीसीसीआयने त्याचा व्हिसा उशिराने केला आहे. ३० मे रोजी सकाळी तो न्यूयॉर्कला जाण्यासाठी निघेल. बीसीसीआयने त्याची विनंती मान्य केली आहे.

टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह, रवींद्र जडेजा, शिवम दुबे, कुलदीप यादव, शुबमन गिल, मोहम्मद सिराज, अक्षर पटेल, सुर्यकुमार यादव, ऋषभ पंत आणि मदतनीस कर्मचारी हे शनिवारी रात्री न्यूयॉर्कसाठी रवाना झाले. ५ जून रोजी भारतीय संघाचा आयर्लंडशी सामना होणार आहे. त्यानंतर ९ जून रोजी पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी भारताचा सामना होईल.

# अलिबागच्या रूद्रा पिळणकरने लाठीकाठीत जिंकली चार पदके



**अलिबाग : प्रतिनिधी**

गोवा येथे झालेल्या दुसऱ्या दक्षिण आशियाई लाठी स्पर्धेत अलिबाग येथील रूद्रा विनय पिळणकर (वय ५) हिने दोन सुवर्ण आणि दोन रौप्य अशी एकूण चार पदके जिंकली आहेत.

दक्षिण आशियाई लाठी स्पर्धेत रूद्राने एकम लाठी प्रकारात एक सुवर्ण, पंचम लाठी प्रकारात एक सुवर्ण, अनिखम प्रकारात एक रौप्य आणि लाठी प्रकारात एक रौप्य अशी एकूण चार पदके पटकावून नेत्रदीपक कामगीरी केली. या कामगिरीबद्दल रूद्राचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

रूदा ही अलिबागमधील केईएस इंग्लिश मीडियम स्कूलची विद्यार्थिनी आहे. शाळेच्या वतीनेही रूद्राचे कौतुक होत आहे. रूद्राला या खेळासाठी प्रशिक्षक प्रियंका गुंजाळ, शुभम नखाते, वेदांत सुर्वे, सिद्धार्थ पाटील यांचे मोलाचे प्रशिक्षण लाभले.

# कमिन्सकडून राजस्थानविरुद्धच्या विजयाचे प्रशिक्षक व्हिटोरीला श्रेय

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

सनरायझर्स हैदराबादने राजस्थान रॉयल्सचा ३६ धावांनी पराभव केला. या विजयानंतर पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखालील हैदराबादने अंतिम फेरी गाठली. त्याचवेळी राजस्थानचा प्रवास संपला. दरम्यान, हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्सने या विजयाचे श्रेय मुख्य प्रशिक्षक डॅनियल व्हिटोरीला दिले.



वास्तविक, मयंक मार्कंडेच्या आधी पॅट कमिन्सने गोलंदाजीची जबाबदारी शाहबाज अहमदकडे सोपवली होती, ज्यानंतर सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. कमिन्सने सांगितले की, डॅनियल व्हिटोरीचा मास्टरस्ट्रोक म्हणजे मयंकपुढे शाहबाजला गोलंदाजी करणे. या निर्णयाने खेळ पूर्णपणे बदलला. शाहबाजने चार षटकांत २३ धावा देत तीन विकेट्स घेतल्या, ज्यात यशस्वी जैस्वाल, रियान पराग आणि रवी अश्विनच्या विकेट्सचा समावेश होता.

कमिन्स म्हणाला की, राजस्थान रॉयल्स संघात उजव्या हाताचे अनेक फलंदाज होते. त्यामुळेच आम्हाला डावखुऱ्या फिरकीपटूकडून गोलंदाजी करायची होती. दरम्यान, शाहबाज आमच्यासाठी एक महत्त्वाचा घटक म्हणून उदयास आला. या मास्टरस्ट्रोक मागे डॅनियल व्हिटोरीचे डोके असल्याचेही त्याने स्पष्ट केले.

सामन्यानंतर बोलताना कमिन्स म्हणाला, आमच्या खेळाडूंनी संपूर्ण मोसमात चमकदार कामगिरी केली आहे. हंगामाच्या सुरुवातीला अंतिम फेरी गाठण्याचे लक्ष्य होते आणि आम्ही ते साध्य केले. आमची ताकद आमची फलंदाजी आहे हे आम्हाला माहीत होते आणि आम्ही या संघातील अनुभवाला कमी लेखणार नाही, मात्र भुवी नटराजन आणि उनाडकट यांच्यामुळे माझे काम सोपे होते. त्याचबरोबर व्हिटोरीने शाहबाजला प्रभावशाली खेळाडू म्हणून खेळवण्याचा दिलेला सल्ला आमच्यासाठी मोलाचा ठरला.

## दुसऱ्या टी-२०मध्ये पाकिस्तान पराभूत

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडने दुसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यात पाकिस्तानला पराभूत करून १-०ने आघाडी घेतली आहे. सध्या पाकिस्तान संघ इंग्लंड दौऱ्यावर असून तिथे चार सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जात आहे. मालिकेतील पहिला सामना पावसाच्या व्यत्ययामुळे रद्द झाला, तर दुसरा सामना जिंकून यजमान इंग्लिश संघाने आघाडी घेतली.

दुसऱ्या सामन्यात नाणेफेक जिंकून पाकिस्तानने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने निर्धारित २० षटकांत ७ बाद १८३ धावा केल्या. कर्णधार जोस बटलरने सर्वाधिक धावा करताना ५१ चेंडूंत ८४ धावा कुटल्या. १८४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तान संघाने १९.२ षटकांत सर्वबाद केवळ १६० धावा केल्या व सामना २३ धावांनी गमावला.

# सुनील गावसकर रियान परागवर संतापले

**चेन्नई : वृत्तसंस्था**

यंदाच्या आयपीएलमधील राजस्थान रॉयल्सचा प्रवास संपुष्टात आला. चेन्नई येथे झालेल्या क्वालिफायर २ सामन्यात सनरायझर्स हैदराबादकडून ३६ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. राजस्थानच्या पराभवाचे मुख्य कारण म्हणजे त्यांची फलंदाजी ठरली. हैदराबादविरुद्ध दडपणाखाली असलेल्या रियान परागने असा चुकीचा शॉट खेळला की कॉमेंट्री करीत असलेले सुनील गावसकर त्याच्यावर संतापले आणि त्यांनी कॉमेंट्री बॉक्समध्येच रियानवर सडकून टीका केली.





राजस्थान रॉयल्सला क्वालिफायर २मध्ये सनरायझर्स हैदराबादकून १७६ धावांचे लक्ष्य मिळाले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना नियमित अंतराने विकेट पडत राहिल्याने सुरुवातीला गती मिळू शकली नाही. पहिल्या १० षटकांत तीन गडी गमावून ७३ धावा केल्यानंतर राजस्थानने ११व्या षटकात सहा धावा केल्या. या वेळी शेवटचा चौकार येऊन बराच वेळ झाला होता आणि त्याचे दडपण रियान परागवर दिसत होते. याच दडपणाखाली परागने चूक केली आणि १२व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर डीप मिडविकेटवर उभा असलेल्या अभिषेक शर्माच्या हाती झेल देत तो बाद झाला.

शाहबाज अहमदचा बळी ठरलेल्या रियान परागला १० चेंडूंचा सामना केल्यानंतर केवळ सहा धावा करता आल्या. पराग ज्या प्रकारे आऊट झाला, ते प्रकार पाहून कॉमेंट्री करीत असलेले सुनील गावसकर त्याच्यावर चांगले संतापले. गावसकर म्हणाले, अशा टॅलेंटचा काय उपयोग, ज्यांना योग्य शॉट सिलेक्शनची निवड करता येत नाही.

रियानचा शॉट पाहिल्यानंतर गावसकर कॉमेंट्री करताना म्हणाले, सिरियसली हा कसला शॉट होता? जर तुम्ही विचारपूर्वक शॉट सिलेक्शन करीत नसाल, तर अशा टॅलेंटचा उपयोग काय? तुमच्यात खूप टॅलेंट आहे. हे मान्य, पण सोबत संयम नसेल तर काही उपयोग नाही. डॉट बॉलच्या दबावाखाली असे फटके खेळून विकेट गमावणे योग्य नाही. डॉट बॉल्स पुढे जाऊन भरून काढता आले असते.

उत्कृष्ट फॉर्मात असलेल्या रियान परागची विकेट सामन्याच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्वाची ठरली. तो बाद झाल्यानंतर १५ चेंडूंत आणखी तीन विकेट पडल्या. त्यामुळे या सामन्यात राजस्थानचा पराभव निश्चित झाला. तो बाद होण्यापूर्वीच संजू सॅमसनची विकेट गेली होती. अशा परिस्थितीत सर्व जबाबदारी रियानवर होती, पण तोही विकेट फेकून निघून गेला. २००८चा चॅम्पियन संघ शेवटपर्यंत या धक्क्यांमधून सावरू शकला नाही आणि हैदराबादने ३६ धावांनी विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला.

# पाकिस्तानच्या कमकुवत बाजूकडे शाहिद आफ्रिदीचे बोट

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

गेल्या दोन महिन्यांपासून आयपीएलचा थरार समस्त क्रीडाप्रेमींनी अनुभवला. आता टी-२० विश्वचषक स्पर्धेचे वेध क्रिकेटप्रेमींना लागल्याचं पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय संघाचा पारंपरिक प्रतिस्पर्धी मानला जाणाऱ्या पाकिस्तानच्या संघाबाबत त्यांच्याच माजी कर्णधाराने केलेले विधान चर्चेत आले आहे.

पाकिस्तानचा माजी कर्णधार आणि अष्टपैलू खेळाडू शाहिद आफ्रिदीने पाकिस्तानच्या क्रिकेट संघाबाबत आपले विश्लेषण केले आहे. आगामी विश्वचषक स्पर्धेमध्ये पाकिस्तानच्या संघाची कामगिरी कशी राहील? अशी विचारणा केली असता आफ्रिदीने पाकिस्तानच्या पुरुष क्रिकेट संघाच्या एका कमकुवत बाजूवर भाष्य केले. पाकिस्तानच्या संघाने मधल्या षटकांमध्ये आपल्या फलंदाजीत सुधारणा करणे गरजेचे असल्याचा सल्ला आफ्रिदीने संघाला दिला आहे.

यंदाच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी पाकिस्तानच्या संघाचा समावेश अ गटात करण्यात आला आहे. या गटात पाकिस्तानसमवेत भारत, आयर्लंड, अमेरिका आणि कॅनडा हे संघ आहेत. पाकिस्तानचा पहिला सामना ६ जून रोजी यजमान अमेरिकेशी होणार आहे. न्यूयॉर्कमध्ये पाकिस्तानची गाठ भारताशी पडेल. इतर संघ तुलनेने पाकिस्तानसाठी सोपे असले तरी भारताशी दोन हात करणे पाकिस्तानला कठीण जाणार आहे. त्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान संघातील कमकुवत दुव्यावर शाहिद आफ्रिदीने बोट ठेवले आहे.



एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार शाहिद आफ्रिदीने म्हटले की, आमच्या फलंदाजांचा स्ट्राईक रेट ही माझ्यासाठी चिंतेची बाब आहे. विशेषत: मधल्या षटकांमध्ये त्यांची फलंदाजी संथ गतीने होते. सात ते १३ षटकांमध्ये पाकिस्तानी फलंदाजांनी त्यांचा स्ट्राईक रेट सुधारायला हवा. या षटकांमध्ये पाकिस्तानने साधारणपणे ८ ते ९ धावा प्रत्येक षटकात वसूल केल्या पाहिजेत, मात्र असे असले तरी यंदाच्या विश्वचषकात पाकिस्तान हीच माझी फेव्हरेट टीम असेल.

**बाबर आझम हुकमाचा एक्का**

शाहिद आफ्रिदीच्या मते पाकिस्तानसाठी यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत बाबर आझम हाच हुकमाचा एक्का ठरणार आहे. संघातले सगळेच खेळाडू महत्त्वाचे आहेत, पण जर तुम्ही गेल्या काही काळातली कामगिरी पाहिली, तर आझमने मोठी भूमिका पार पाडणे आवश्यक आहे. तसे पाहता मोहम्मद रिझवान, फखर झमान, शाहीन आफ्रिदी, नसीम शाह, हारिस रौफ, शादाब खान हे सगळेच खेळाडू संघाच्या कामगिरीत महत्त्वाची भूमिका बजावतात. हेच खेळाडू पाकिस्तानसाठी महत्त्वाचे ठरणार आहेत, असे शाहीद म्हणाला.

## भालाफेकपटू नीरज चोप्राला दुखापत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा २८ मे रोजी ऑस्ट्रावा गोल्डन स्पाइकमध्ये सहभागी होणार नाही. याबाबत दुजारा देताना आयोजकांनी सांगितले की, दुखापतीमुळे तो या स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही, मात्र तो या कार्यक्रमाला पाहुणा म्हणून उपस्थित राहणार आहे.

नीरज चोप्राला त्याच्या डक्टर स्नायूंना दुखापत झाली आहे. नीरजची तपासणी केली जात असून त्यानंतर रिहॅबिलिटेशनची प्रक्रिया सुरू करता येणार आहे.

# वडिलांच्या आठवणीने सचिन तेंडुलकर भावूक



**मुंबई : प्रतिनिधी**

क्रिकेटचा देव, मास्टर ब्लास्टर अशा नाना नावांनी ओळखला जाणारा मास्टर ब्लास्टर त्याच्या वडिलांच्या आठवणीत भावूक झाला. भारतीय क्रिकेट संघाचा माजी खेळाडू सचिन तेंडुलकरने त्याच्या बाबांच्या आठवणींना उजाळा देत एक भावनिक पोस्ट केली आहे.

सचिनने पोस्टच्या माध्यमातून म्हटले की, बाबा आम्हाला सोडून गेलेल्याला २५ वर्षे झाली, पण आजही त्यांच्या या जुन्या खुर्चीवर बसल्यावर वाटते की, ते आजही आमच्यासोबत इथे आहेत. तेव्हा मी केवळ २६ वर्षांचा होतो, आणि आता माझे वय ५१ आहे. त्यांनी माझ्या आयुष्यावर आणि इतर अनेकांच्या जीवनावर किती प्रभाव पाडला हे मला अधिक स्पष्टपणे दिसत आहे. त्यांच्या २५व्या पुण्यतिथीला ४३ वर्षांनंतर या ठिकाणाला भेट देणे हे अत्यंत भावनिक होते. त्यांचे शहाणपण आणि त्यांचा दयाळूपणा मला सतत प्रेरणा देतो.

बाबा, मला दररोज तुमची आठवण येते. तुम्ही माझ्या जी मूल्ये रुजवलीत त्यानुसार मी जगत आहे, असेही सचिनने पोस्टमध्ये नमूद केले आहे.

# घटस्फोटाच्या चर्चांदरम्यान हार्दिकची पत्नी नताशाच्या इन्स्टा स्टोरीने खळबळ

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटपटू हार्दिक पांड्या आणि नताशा स्टॅनकोविक यांच्या घटस्फोटाबाबत अनेक चर्चा सुरू आहेत, मात्र याला कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. सोशल मीडियावर घटस्फोटाची चर्चा आहे. दरम्यान, आता नताशाने तिच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अशी तरी पोस्ट केलीय, ज्यामुळे खळबळ उडाली आहे. वास्तविक, नताशाने तिच्या इन्स्टाग्रामवर अनेक स्टोरी पोस्ट केल्या आहेत. त्यापैकी एक सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल झाली आहे.

नताशाने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आहे, ज्यामध्ये ती तिचा मुलगा अगस्त्यासोबत दिसत आहे. यासोबतच तिने पाठीमागे एक इंग्रजी गाणेही जोडले आहे. त्याचवेळी तिच्या पुढील दोन स्टोरींमध्ये ती वर्कआउट करताना दिसत आहे. काही तासांपूर्वी तिने इन्स्टाग्रामवर आणखी एक स्टोरी पोस्ट केली होती, ज्यामध्ये नताशाने लिहिले होते, 'कोणीतरी रस्त्यावर येणार आहे.' या पोस्टच्या पार्श्वभूमीत ड्रायव्हिंग स्कूल मॅन्युअलचा एक साइनबोर्ड दिसत आहे. सोशल मीडियावर चाहत्यांकडूनही याविषयी प्रतिक्रिया येत आहेत.

वास्तविक, सोशल मीडियावर एक पोस्ट व्हायरल झाली होती, ज्यामध्ये असा दावा करण्यात आला होता की नताशाने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून तिचे आडनाव हटवले आहे. असे म्हटले जात होते, नताशा आधी तिचे नाव इन्स्टाग्रामवर 'नताशा स्टॅनकोविक पांड्या' असे लिहायची,



पण आता तिने पांड्या आडनाव काढून हटवले आहे. यानंतर दोघांमध्ये सर्व काही ठीक नसल्याच्या बातम्या येऊ लागल्या. विशेष म्हणजे ४ मार्चला नताशाचा वाढदिवस होता, पण हार्दिकने तिच्या शेवटच्या वाढदिवसाला एकही सोशल मीडिया पोस्ट शेअर केली नव्हती. नताशा आणि हार्दिक दोघेही सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत, पण हार्दिकच्या टाइमलाइनवर वाढदिवसासंदर्भात एकही पोस्ट दिसली नाही.

मुंबई इंडियन्सने हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली यंदाचा आयपीएल हंगाम खेळला, ज्यामध्ये संघाची कामगिरी खूपच खराब होती आणि ते प्ले ऑफसाठी पात्र ठरू शकले नाहीत. या संपूर्ण स्पर्धेतही नताशा मुंबई इंडियन्स आणि हार्दिक पांड्याला पाठिंबा देण्यासाठी स्टेडियममध्ये दिसली नाही. असा दावाही केला जात आहे की नताशाने हार्दिकसोबतच्या नुकत्याच केलेल्या सर्व पोस्ट सोशल मीडियावरून हटवल्या आहेत. हार्दिक आणि नताशा बऱ्याच दिवसांपासून सोशल मीडियावर एकत्र दिसत नाहीत. नताशा आणि हार्दिक यांचे २०२०मध्ये लग्न झाले असून दोघांनाही एक मुलगा आहे.

**हार्दिकच्या संपत्तीतील मोठा हिस्सा होणार नताशाच्या नावे?**

क्रिकेटपटू हार्दिक पांड्या आणि त्याची पत्नी नताशा स्टॅनकोविक घटस्फोट घेणार असल्याची चर्चा सुरू आहे. याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही, मात्र रिपोर्टनुसार घटस्फोटानंतर हार्दिकच्या संपत्तीतील ७० टक्के संपत्ती ही नताशाच्या नावे होणार आहे. यामुळे हार्दिकची आर्थिक स्थिती खराब होण्याची शक्यता आहे. सोशल मीडियावर या संबंधित अनेक पोस्टदेखील व्हायरल होत आहेत.


जीवेत् शरद: शतम्!

विकास नारंगीकर

यांना वाढदिवसाच्या



हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

हरेश कोळी


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com